मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

उत्सर्ग भावसत्वः म प्र

# हितगुज

फक्त खाजगी वितरणासाठी

अंक ५१ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● सप्टेंबर २००२

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

## अनुक्रमणिका

१. प्रतिष्ठान वृत्त.................... पृ.२ ते ४
२. सभासद वृत्त........................ पृ.५
३. प्रतिसाद - कुटुंब सल्ला समिती...... पृ.५
सौ. मंगला प्रवीण
४. तरुणवर्गाच्या सहभागासाठी :
डोंगर सहल व संमेलन .............. पृ.६
विनीत माधव चक्रदेव
५. उद्योग प्रवर्तन - काही विचार......... पृ.६
मनोहर दामोदर मराठे
६. विभागीय संमेलन - मिरज........ पृ.७,८
विनायक केशव मराठे
७. अनुकरणीय......................... पृ.७
विठ्ठल महादेव मराठे
८. मोहाचा क्षण...................... पृ.९,१०
शशांक श्रीधर मराठे
९. पेन्शनचा फोटो................ पृ.१० ते १२
विठ्ठल महादेव मराठे
१०.चाकोरीबाहेर...................... पृ.१०
११.दोन कविता - तरुणांच्या.......... पृ.१२
आशिश मोरेश्वर मराठे व सौ. रमा वासुदेव दांडेकर
१२.हवेचे पूर्वानुमान कसे तयार होते ?.. पृ.१६
प्रेषक : वामन आत्माराम मराठे
१३.५०व्या अंकाचे स्वागत......
वामन आत्माराम.......................... पृ.६
सदानंद प्रभाकर विद्वांस.................... पृ.८
विठ्ठल महादेव............................ पृ.९
नितीन गोविंद विद्वांस, कालीदास बाळकृष्ण
व प्रभाकर गजानन....................पृ.११
भास्कर दत्तात्रय.........................पृ.१२

**जाहिरातीसाठी कुलबांधवांना आवाहन**

पाव पान रु. ६००, अर्धे पान रु. १२००,
पूर्ण पान रु. २४००, कव्हर रु. ३५००

## 'ह.मों.'च्या हस्ते ५० व्या अंकाचे प्रकाशन



(डावीकडून) अध्यक्ष अरविंदराव, संपादक लक्ष्मण शंकर, ह. मो. आणि कार्यवाह विनायक केशव



'ह.मों'चे स्वागत करताना
अध्यक्ष अरविंदराव
पाठीमागे संपादक लक्ष्मण शंकर

## मधुसूदन खांबेटे यांना शौर्यपदक



मधुसूदन खांबेटे यांना शौर्यपदक प्रदान करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरविंदराव. डावीकडे शौर्यनिधी आणि शौर्य पदकाचे संकल्पक वामन गणेश

**मराठे प्रतिष्ठान**

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी,
मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळ सभा

महिन्याच्या २ऱ्या शनिवारी सायं. ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. ४थ्या शनिवारीहि गरजेनुसार सभा घेण्यात येते. सभेच्या दिवशी सायं. ५ वाजता कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटू शकतो.

मागील तिमाहीत ८ जून, १३ व १७ जुलै आणि १० ऑगस्ट रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. पैकी ८ जूनची सभा बोरिवली मेळाव्यापूर्वी **दिलीप वसंत (पृ.४०८) यांच्या घरी** घेण्यात आली. (मेळाव्याचा वृत्तांत ५०व्या अंकांत दिलेला आहे.) प्रतिष्ठानचे **विश्वस्त आनंद यशवंत** १३.७, २५.७ व १०.८ या तीन्ही सभांना उपस्थित होते. तसेच **पूर्व-विश्वस्त मोहन सदाशिव** १०.८ च्या सभेला, **पूर्व-कार्यवाह डॉ. सुरेंद्रनाथ गणेश** १३.७ च्या सभेला व कै. सुरेशभाऊंच्या पत्नी, आता प्रतिष्ठानच्या **विश्वस्त सुलभाताई** १३.७ च्या सभेला उपस्थित होत्या.

## हितगुज सुवर्णमहोत्सवी अंक

२५.५ च्या सभेत हितगुज जून अंक सुवर्णमहोत्सवी अंक म्हणून जास्त पानांचा व आकर्षक स्वरूपांत प्रसिद्ध करण्याचे ठरविण्यात आले होते. त्यानुसार १६ ऐवजी ३६ पानांचा ४ रंगी मुखपृष्ठ व मलपृष्ठ असणारा हितगुजचा ५०वा अंक **१३.७ च्या सभेत सुप्रसिद्ध साहित्यिक कुलबांधव ह. मो. मराठे (पृ.५३७) यांच्या हस्ते प्रकाशित** करण्यात आला. या वेळी 'ह.मो.'चा, तसेच हितगुजचे संपादक लक्ष्मण शंकर आणि ५०व्या अंकाची मुखपृष्ठापासूनची सजावट करणारे कुलबांधव राजा मराठे (पृ.३२५) यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

हितगुजच्या वाटचालीचा आढावा घेऊन **ल. शं. मराठे यांनी सांगितले की** २०० रु. तहहयात वर्गणीत १६ पानांचे ४ अंक देणे आता शक्य नाही. वर्गणीचे येणारे व्याज पोस्टखर्चालाहि आता पुरत नाही. तेव्हा **जाहिराती व देणग्या यांचेवरच यापुढे हितगुजची भिस्त रहाणार आहे.** वर्गणीदार वाढवून खर्च भागवणे शक्य होणार नाही.

**ह. मो. मराठे म्हणाले** की टपालखर्चात बेसुमार वाढ झाल्यामुळे नियतकालिके चालविणे आता अशक्यप्राय झाले आहे. आपला अशा छोट्या छोट्या ज्ञातिसंस्थांना एके काळी विरोध होता; पण आता परिस्थिती बदलली आहे. असुरक्षिततेची भावना नष्ट करायची असेल तर अशा ज्ञातिसंस्था असण्यास काहीच हरकत नाही. मात्र स्वत:च्या उन्नतीचे प्रयत्न, अट्टाहास करताना दुसऱ्या ज्ञातींबद्दल आकस नसावा हेहि त्यांनी आवर्जून सांगितले.

## विभागीय मेळावा, मिरज

सांगली, कोल्हापूर व सातारा जिल्ह्यांतल्या कुलबांधवांचा मेळावा, **मिरज येथील उद्योगपति अरविंद गोविंद** (पृ.४८०) यांच्या पुढाकाराने राधा-गोविंद हॉलमधे रविवार दि. ४ ऑगस्ट रोजी घेण्यात आला. प्रतिष्ठानचे कार्यवाह विनायक केशव आणि कोषाध्यक्ष सीताराम गोपाळ खांबेटे मुद्दाम उपस्थित राहिले.

या मेळाव्याचा विनायक केशव यांनी दिलेला वृत्तान्त याच अंकात छापला आहे. त्यांच्या वृत्तांतानुसार हा मेळावा नुसता 'उपयुक्तच नव्हे तर आदर्श' झाला, याचे सारे श्रेय अर्थातच आयोजक अरविंदराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे.

या मेळाव्यात कोल्हापूरमधील कुलबांधवाने **याच ठिकाणी अखिल भारतीय संमेलन व्हावे अशी इच्छा व्यक्त केली.** ती फलद्रूप झाली तर मेळाव्याला उपस्थित नसलेल्या अनेकानेक कुलबांधवांना मिरजवासी अरविंदरावांच्या आदर्श आयोजकत्वाचा प्रत्यय घेण्याची संधी मिळेल अशी आशा करू या.

## वार्षिक सर्वसाधारण सभा

मराठे प्रतिष्ठानची २०वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १८ ऑगस्ट २००२ रोजी मुलुंड (पूर्व) येथील 'सुयोग सोसायटी'च्या हॉलमधे घेण्यात आली. सभेला ४६ कुलबांधव/भगिनी उपस्थित होते. (मागील वर्षी ३२). याशिवाय ५ गुणवत्ताधारक विद्यार्थीहि पारितोषिक घेण्यासाठी जातीने हजर होते.

या सभेत वार्षिक अहवाल, हिशेबपत्रके मंजुरी, हिशेब तपासनीसांची नियुक्ती अशा नित्याच्या कामांबरोबरच खालील प्रश्नांवर उपयुक्त चर्चा झाली.

१) **सभासद वाढ -** विशेषत: महिला सभासद वाढ





*'ह.मों.'च्या हस्ते संपादक लक्ष्मण शंकर* ↑
*आणि चित्रकार राजाराम नारायण यांचा सत्कार* →

Marathe Pratishthan



*हितगुज सुवर्णमहोत्सवी अंकाच्या प्रकाशनप्रसंगी उपस्थित बंधु-भगिनी. अगदी उजवीकडे पहिल्या रांगेत शेवटी विश्वस्त सुलभा सुरेश*

२) **अध्यक्ष अरविंद दामोदर** (पृ.२९२) यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणांत शैक्षणिक मदत व वैद्यकीय सहाय्य घेण्यासाठी लोकांनी पुढे



*सभेचे प्रास्ताविक करताना अध्यक्ष अरविंदराव. त्यांच्या डावीकडे कोषाध्यक्ष सी. गो. खांबेटे, शेवटी हितगुजचे संपादक लक्ष्मण शंकर आणि उजवीकडे कार्यवाह विनायक केशव, विश्वस्त आनंद यशवंत आणि शेवटी मधुसूदन रामकृष्ण खांबेटे*

यावे असे आवाहन केले. तसेच उद्योगप्रवर्तनाचे कार्य प्रभावीपणे करण्यासाठी, तरुणांचा अधिक सहभाग मिळवण्यासाठी काय व्यूहरचना करावी याचाहि विचार होण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच सध्याच्या परिस्थितीत जे अनेक कौटुंबिक ताणतणाव निर्माण होत आहेत त्या संदर्भात मार्गदर्शन करणाऱ्यासाठीहि प्रतिष्ठानच्या माध्यमातून काहीतरी व्यवस्था निर्माण करण्याबाबत विचार चालू असल्याचे सांगितले. (याबाबतचे सौ. मंगल प्रवीण यांचे पत्र याच अंकात आहे.)

३) **उद्योगप्रवर्तन कल्पना राबवण्यात मोहन सदाशिव (पृ.३६५) यांनी पुढाकार घेण्याचे** मान्य केले. तसेच त्यांनी उद्योग प्रवर्तन निधीसाठी रु. ५००० ची देणगीहि जाहीर केली. विलेपार्ले मधील **अनुभवी प्रोजेक्ट कन्सल्टंट श्री. हेमंत महादेव** (पृ.४७१) यांचीहि त्यांना या कार्यात साथ मिळेल. त्यांनीहि आपले विचार मांडले.

याच बाबतीत **अंबरनाथचे कुलबांधव मनोहर दामोदर** (पृ.२७५) यांनी अनेक निश्चित स्वरूपाच्या सूचना केल्या. (या अंकांत स्वतंत्रपणे छापल्या आहेत.)

४) **तरुणांच्या सहभागाचे बाबतीत** वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड मधील **कुलबांधव विनीत माधव चक्रदेव** (पृ.७३५) यांनी डोंगरभ्रमण आणि संमेलनाची एक अभिनव कल्पना मांडली. (या अंकात स्वतंत्रपणे छापली आहे.) या कल्पनेला उपस्थित तरुण-तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसला. पाहूया तरुणांच्या सहभागासाठी एक नवा मार्ग मिळतो का!

५) **वैद्यकीय मदतीच्या संदर्भात** लक्ष्मण शंकर (पृ.५२०) यांनी असा विचार मांडला की वैद्यकीय मदतीसाठी मिळालेल्या देणगीच्या व्याजातून प्रतिष्ठानच्या माध्यमातून वैद्यकीय मदत करायला मर्यादा आहेत. निरनिराळ्या आजारात औषधे, शस्त्रक्रिया यासाठी होणारा मोठा खर्च लक्षात घेता मेडिक्लेमसारख्या विम्याकडे दुर्लक्ष केले जाऊ नये. याच संदर्भात **विलेपार्ले येथील सौ. स्वाती हेमंत** (पृ.४७१) यांनी माहिती दिली की **कॅन्सर पेशन्ट एड असोसिएशनकडे** आपण एकदाच सुमारे साडेसहा हजार रुपये भरून सभासद झालात तर आपणास हयातभर दरवर्षी मोफत कॅन्सर तपासणी आणि आजारी पडल्यास दरवर्षी रु. २ लाखांपर्यंत खर्चाची भरपाई मिळू शकते. तसेच **'लाईफ लाईन' या कंपनीचे आपण सभासद झाल्यास** आपणास हॉस्पिटलमधे आधी डिपॉझिट न भरता वैद्यकीय मदत मिळू शकते. तसेच हॉस्पिटलमधे आपणास काही सहाय्य हवे असल्यास दिले जाते आणि हॉस्पिटल मधून घरी जातानाहि तुमच्या निर्दिष्ट मर्यादेपर्यंतचे बिल न भरता जाता येते. पैसे परस्पर विमा कंपनीकडून भरले जातात.

कुलबांधवांनी याबाबत **अधिक माहितीसाठी स्वाती हेमंत यांचेशी** ५१७७७५७ अथवा ६१५२८७४ या फोन नंबरवर **संपर्क साधावा.**

६) या सभेचे एक वैशिष्ट्य म्हणजे **शौर्यपदक निधीची स्थापना**. आपले कुलबांधव मधुसूदन रामकृष्ण खांबेटे (पृ.६९५) हे ठाण्यांतले एक



*आपली शौर्यकथा निवेदन करताना मधुसूदन रामकृष्ण खांबेटे*

जाने-माने, लघुउद्योजक. ठाण्यातल्या लघुउद्योगांच्या असोसिएशनचे संस्थापक. दि. १३ ऑगस्ट रोजी रात्री त्यांच्या घरी चोरट्यांनी (की दरोडेखोरांनी) त्यांच्या घरापुढील लोखंडी दरवाजा उखडण्याचा प्रयत्न केला. श्री. खांबेटे पहाटे ४च्या सुमारास नेहमीप्रमाणे उठले. दिवा लावला. त्यामुळे चोरटे बहुधा पळाले असणार. पण खांबेटे स्वस्थ बसले नाहीत.

त्यांना खिडकीतून रस्त्यावर दोन

Marathe Pratishthan

## आपण यांना ओळखतां का?

खालील पत्यांवर पाठवलेले हितगुज 'पत्ता बदलला' असा शेरा मारून परत आले आहेत. ज्यांना कोणाला या व्यक्तींचा ठावठिकाणा माहीत असेल त्यांनी संपादक हितगुज यांना कळवावे.

१) **सौ. माणिक योगेश** मिठ्ठनखेडीवाले, १२ एफ., रोडियो कॉलनी, भुज ३७०००७. (३११८/८०५)

२) **आनंद प्रभाकर** मराठे, द्वारा डॉ. अंतुरकर, अंबाबाई तलावाजवळ, शिरवळ, जि. सातारा. (२८६९/५५२)

३) **डॉ. वासुदेव मोरेश्वर** मराठे, केदार छाया, सदरबझार, कृष्णराव देसाई कॉलनी, सातारा ४१५ ००२. (२५६६/४५२)

४) **सौ. अलका उदय** बेलापूरकर, फ्लॅट नं. ६, सरगुरोह पार्क, देवनार फार्म रोड, चेंबूर, मुंबई ४०० ०७१. (३१०९/७९८)

५) **आनंद शंकर** मराठे, मोहित पार्क, २रा मजला, दमण रोड, वापी, जि. बलसाड, ३९६ १९१. (२६९०/७८८)

६) **संग्राम अशोक** मराठे, ६बी, श्रीपन्त भुवन, ५३३ एस.व्ही.पी. रोड, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई ४०० ००७. (२८७८/५११)

७) **उपेंद्र दत्तात्रय** मराठे, २६/१८२१ समाधान सोसायटी, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई ४०० ०३३. (३०१०/७११)

८) **अरुण वसंत** मराठे, ए२७/५ वेदनगर, नानाखेडा, सावेर रोड, उज्जैन ४५६ ०१०. (२९२२/५९४)

माणसांची संशयास्पद हालचाल दिसली. त्यांनी मुलाला उठवले व स्वत: काठी घेऊन बाहेर रस्त्यावर आले. रस्त्यांतील दोन्ही गुंडांनी शस्त्र दाखवून जीव हवा असेल तर पुढे न येण्याबद्दल सांगितले. खांबेटे कसले थांबतात? ते पुढे येतात हे पाहून एका गुंडाने हातातले शस्त्र त्यांना फेकून मारले. ते त्यांनी चुकवले. आता गुंडाकडे शस्त्र नाही हे पाहून खांबेटेंनी धावत जाऊन एका गुंडाला काठीने झोडपायला सुरवात केली; दुसरा पळाला.

खांबेटेंची काठी मोडली. आता काय करायचे? खांबेटेंनी त्या तगड्या गुंडाच्या कमरेला मिठी मारली. दोघेहि खाली पडले. झटापट चालू झाली. त्याने खिशातून चाकू काढून खांबेटेंच्या पाठीवर वार करून तो पळू लागला. तशाहि अवस्थेत खांबेटेंनी पाठलाग सोडला नाही. त्यांचा मुलगाहि बरोबर होता. आरडा-ओरडा ऐकून लोकहि जमले. त्या गुंडाला पकडून पोलिसांच्या हवाली केले.

पोलिसांनी त्या गुंडाला पहाताच ७२ वर्षांच्या लहानखुऱ्या खांबेटेंच्या या अतुलनीय पराक्रमाबद्दल अचंबा व्यक्त केला. २/३ पोलिसांचे खून पाडलेला तो गुंड होता. (हॉस्पिटलमधेहि त्याच्या हातापायात बेड्या अडकवून ठेवल्याचेहि खांबेटेंनी सांगितले.)

श्री. खांबेटे यांच्या पाठीला दोन अडीच इंच जखम होती. १५ टाके डॉक्टरनी घातल्याचे सांगितले. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांत ही हकिगत वाचताच आपले **विश्वस्त आनंद यशवंत (पृ.२७७) आणि संपादक लक्ष्मण शंकर (पृ.५२०) यांनी खांबेटेंना पुष्पगुच्छ देऊन** त्यांच्या शौर्याबद्दल आनंद व्यक्त केला.

प्रतिष्ठानचे संस्थापक **वामन गणेश (पृ.५०३) यांना ही हकिगत कळतांच** त्यांनी आनंद यशवंत यांना फोन करून एक शौर्यपदक तयार करून आणायला सांगितले आणि १८.८.२००२ च्या वा. स. सभेत प्रतिष्ठानमधे **शौर्यनिधि निर्माण करण्यासाठी १ हजार रुपयांचा चेक आणि श्री. खांबेटेंना देण्यासाठी शौर्यपदक** आपले अध्यक्ष अरविंद दामोदर (पृ.२९२) यांचे स्वाधीन केले. त्यांनी ते पदक सन्मानपूर्वक श्री. मधुसूदन खांबेटे यांना बहाल केले. सर्व सभेने उत्स्फूर्तपणे उत्थापन देऊन त्यांच्या शौर्याचा सन्मान केला.

नंतर श्री. मधुसूदन खांबेटे यांनी स्वत: ही हकिगत सभेत निवेदन केली आणि प्रतिष्ठानच्या शौर्यनिधीत स्वत:ची रु. १००० ची देणगी जाहीर केली. या निधीतून प्रतिवर्षी अशा प्रकारची कामगिरी करणाऱ्या कुलबांधवांना शौर्यपदक द्यावयाचे आहे.

**बक्षीस समारंभ :**


सभेचे कामकाज संपल्यानंतर २००१-२००२ सालातल्या गुणवत्ताधारक कुलबांधवांचा सत्कार **महाराष्ट्र टाईम्सचे निवृत्त सहसंपादक अनंत सदाशिव (पृ.३६४), मुलुंड यांचे हस्ते** करण्यात आला. मुंबईतील ५ गुणवान विद्यार्थ्यांनी स्वत: उपस्थित राहून पारितोषिके स्वीकारली तर अन्य ६ जणांची पारितोषिके त्यांच्या नातेवाईकांनी स्वीकारली. मराठे परिवारातल्या सर्व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांची समग्र यादी पुढील डिसेंबर अंकात देण्यात येईल.

**गुणवत्ता पारितोषिकांबाबत :**

गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांकडून अर्जाची मुदत १५ ऑगस्ट ठेवली होती. ती ३० सप्टेंबरपर्यंत वाढवली आहे.

***

## २००१-०२ मधील गुणवत्ताधारक



*उभे (डावीकडून) - श्रीपाद पुरुषोत्तम खांबेटे, नरहरी मुकुंद, दीप्ती अनंत, अनघा शरद्चंद्र आणि सुप्रिया राजेंद्र. बसलेले (डावीकडून) - पारितोषिक समितीचे निमंत्रक प्रमोद कृष्णा, पारितोषिक समारंभाचे अध्यक्ष अनंत सदाशिव, म.प्र. चे कार्यवाह विनायक केशव आणि सहकार्यवाह हेमंत अरुण.*



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

## मानसन्मान

### डोंबिवली नागरी सहकारी बँकेच्या उपाध्यक्षपदी अरविंद दामोदर



प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरविंद दामोदर (पृ.२९२) हे २०.१.२००२ रोजी झालेल्या निवडणुकीत डोंबिवली नागरी सहकारी बँकेचे संचालक म्हणून निवडून आले. बँकिंग क्षेत्रातील सुमारे ३० वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवाचा फायदा मिळावा म्हणून त्यांना डोंबिवली नागरी बँकेच्या संचालक मंडळात सामावून घेण्यात आले.

बँकेच्या गुंतवणूक समिती, बिग लोन कमिटी, कर्ज वसुली समिती, एम्.आय.डी.सी. शाखा कमिटी, पेंढारकर कॉलेज शाखा कमिटी आणि तळासरी शाखा कमिटी अशा सहा समित्यांवर त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नुकत्याच १७ ऑगस्ट रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत त्यांची बँकेचे उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे.

अरविंदरावांचे अभिनंदन आणि या बँकेच्या कामकाजात याहूनहि मोठ्या जबाबदाऱ्या पेलण्याचे सामर्थ्य त्यांना लाभो अशा सर्व कुलबांधवांच्या शुभेच्छा!

### माणिक चंद्रचूड, पुणे

सुझुकी ग्रुपतर्फे फुकुओका (जपान) येथे आयोजित करण्यात आलेल्या एशिया पॅसिफिक इंग्लिश प्रेझेंटेशन स्पर्धेत पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थिनी **माणिक चंद्रचूड (प्रतिष्ठानचे सभासद बाळकृष्ण रामचंद्र, पृ.४७६ यांची नात)** हिने **विविध देशांतून आलेल्या ३४१ स्पर्धकांमध्ये प्रथम क्रमांक पटकावून चषक, प्रशस्तिपत्र आणि २ हजार डॉलरची स्कॉलरशिप** मिळविली. १ वर्षापूर्वी तिने लंडन येथे इंटरनॅशनल पब्लिक स्पीकिंग कॉम्पिटिशन मध्ये 'बेस्ट नॉन-नेटिव्ह इंग्लिश स्पीकर' चे प्रथम पारितोषिक मिळविले होते.

चि. माणिक च्या उज्ज्वल यशाबद्दल तिचे अभिनंदन आणि आंतरराष्ट्रीय स्तरातील वक्तृत्व स्पर्धेत आणखी एक सर्वोच्च पारितोषिक मिळवून 'हॅटट्रिक' करण्याची संधी चि. माणिकला मिळो अशा सर्व कुलबांधवातर्फे शुभेच्छा!

### अल्पना उदय, मुलुंड

मुलुंड येथील सभासद **उदय दत्तात्रय** (पृ.३२६) **यांची मुलगी अल्पना** हिने दत्ता मेघे इंजिनियरिंग कॉलेज, ऐरोली, नवी मुंबई येथून B. E. Electronics ची पदवी संपादन केली असून शिकागो येथील डी. पॉल युनिव्हर्सिटीत एम.एस. करण्यासाठी ती २.८.२००२ रोजी येथून अमेरिकेला रवाना झाली. अल्पनाच्या या शैक्षणिक भरारीबद्दल तिचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन!



### क्रिकेटपटु सुशांत

विलेपार्ले, मुंबई येथील सभासद **मंगला महादेव** (पृ.४७१) यांचा नातू **सुशांत हेमंत** याची बंगलोर येथील राष्ट्रीय क्रिकेट अॅकॅडेमीच्या एक महिन्याच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. (१९ वर्षाखालील गटांत) मुंबईतून या प्रशिक्षणासाठी त्याची एकट्याचीच निवड झाली आहे.

## नांदा सौख्य भरे

आजगांव, जि. सिंधुदुर्ग येथील प्रतिष्ठानचे सभासद **लक्ष्मण पांडुरंग (पृ.५३४) यांची कन्या स्नेहल** हिचा शुभविवाह सचिन सूर्यकांत सुळे, संगमेश्वर यांचेशी ६.६.२००२ रोजी थाटात साजरा झाला. नवविवाहितांना सुखी व संपन्न जीवन लाभो अशी मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा.

## सहवेदना

१) तासगांव, जि. सांगली येथील **कुलबांधव विश्वनाथ रामचंद्र चक्रदेव** (पृ.७३१) यांचे २८.७.२००१ रोजी दु:खद निधन झाले.

२) प्रतिष्ठानचे **पुण्यातील सभासद**, पुणे विद्यापीठाच्या पदार्थ विज्ञान विभागातील मानसेवी प्राध्यापक (प्रोफेसर एमेरिटस) **बाळकृष्ण रामचंद्र** (पृ.४७६) **यांची पत्नी लीला** यांचे २५ फेब्रुवारी २००२ रोजी निधन झाले. त्यांचे वय ७८ वर्षे होते.

३) परळ, मुंबई येथील **कुलबांधव पांडुरंग विश्वनाथ** (पृ.११७) यांचे २६.४.२००२ रोजी दु:खद निधन झाले. ते ८० वर्षांचे होते.

४) अहमदाबाद येथील **कुलबांधव गणेश काशिनाथ** (पृ.५३४) यांचे ९.५.२००२ रोजी वापी स्टेशन येथे हार्ट अॅटॅकने निधन झाले. ते ६३ वर्षांचे होते.

५) दहिसर, मुंबई येथील **कुलबांधव विश्वनाथ काशिनाथ** (पृ.५३४) **यांची पत्नी शैलजा** हिचे ६९व्या वर्षी ११.५.२००२ रोजी कंजेनिटल हार्टट्रबल या आजाराने निधन झाले.

**वरील सर्वांच्या कुटुंबीयांच्या दु:खात मराठे परिवार सहभागी आहे.**

### प्रतिसाद — कुटुंब सल्ला समिती

हितगुजचा सुवर्णमहोत्सवी अंक मिळाला. या अंकात पृष्ठ क्र.३ वर एक चौकट आहे. या चौकटीत श्री. अरविंद दा. मराठे यांची कुटुंब सल्ला समितीची सूचना आहे. मला ही सूचना खूप स्तुत्य वाटली याचे कारण म्हणजे मी स्वत: १५ वर्षे हे काम करीत आहे. त्यामुळे हा माझा जिव्हाळ्याचा विषय आहे. गोरेगाव येथील 'स्वाधार' या कुटुंब सल्ला केंद्रात मी काम करते. प्रतिष्ठानतर्फे जर असा काही उपक्रम सुरू करण्याचा मानस असेल तर त्यात सहभागी होण्याची माझी इच्छा आहे. या क्षेत्रातल्या माझ्या अनुभवाचा उपक्रमाला निश्चित उपयोग होईल. आणि तसा उपयोग व्हावा अशी माझी इच्छा आहे.

- **सौ. मंगला प्रवीण** (पृ.३६१), गोरेगाव, मुंबई

(सौ. मंगला मराठे यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल धन्यवाद. त्यांचेकडून याबाबत सविस्तर लेख मागितला आहे. त्यांचेशी चर्चा करून यासंबंधीच्या कार्याची रूपरेषा ठरवण्याबाबत कार्यवाही पूर्ण झाली की बहुधा पुढील डिसेंबर अंकांत तपशील जाहीर करता येईल असे वाटते. - **संपादक**)

Marathe Pratishthan

# तरुण वर्गाच्या सहभागासाठी : डोंगर सहल व संमेलन

***विनीत चक्रदेव यांनी १८.८.०२ च्या वा. स. सभेत केलेले आवाहन***

तरुण वर्गाचा प्रतिष्ठानशी जवळून संबंध रहावा यासाठी एक योजना माझ्या मनात आहे. शनिवार दि. १६ नोव्हेंबर २००२ संध्याकाळ ते रविवार १७ नोव्हेंबर दुपारपर्यंत वैजनाथ येथील शिवमंदिरात प्रतिष्ठानचे स्नेहसंमेलन व्हावे अशी इच्छा आहे.

तत्पूर्वी दि. १५ नोव्हेंबर शुक्रवार, रोजी प्रतिष्ठानशी संबंधित तरुण वर्गाची (वयोमर्यादा कमीतकमी १६ व जास्तीत जास्त ५५) एक डोंगरसहल आयोजित करण्याचे माझ्या मनात आहे.

सहलीचे स्वरूप याप्रमाणे राहील. ज्यांना सहलीमध्ये भाग घ्यावयाचा आहे अशा सर्वांनी दि. १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. पर्यंत वैजनाथ, ता. कर्जत येथे श्री. विनीत चक्रदेव यांचे घरी यायचे आहे. दुपारचे जेवण घरीच होऊन सहलीला सुरवात होईल. संध्याकाळपर्यंत सहल एका दुसऱ्या गावाच्या मुक्कामी जाईल. तिथे सर्व व्यवस्था केलेली असेल. दुसऱ्या दिवशी सकाळी चहा, अल्पोपहार झाल्यावर थोडीशी अजून भटकंती होईल व तिथेच जेवण होऊन दु. ४ वा. पर्यंत सहल वैजनाथ येथे परत येईल.

१६ नोव्हेंबर संध्या. ४ ते ५ पासून संमेलनासाठी सर्व मंडळी येतील व हा सहलीचा ग्रुपही संमेलनाला जॉईन होईल. संध्याकाळी गप्पागोष्टी, चहा, भोजन यानंतर दोन तास करमणुकीचा कार्यक्रम ज्यांना जमेल त्यांनी सादर करावा.

१७ नोव्हेंबर सकाळी थोडे गमतीदार खेळ, चहा, अल्पोपहाराच्या बरोबर मनमोकळ्या गप्पागोष्टी दु. ११ ते १२ या वेळात होतील. पुढील २ तासात भोजन होऊन संमेलनाची सांगता सोईल.

संमेलन - खर्च. प्रत्येकी ८० ते १०० रु. पर्यंत येईल. सहलीसाठी प्रत्येकी रु. ७५ खर्च होईल.

या कार्यक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी **विनीत माधव चक्रदेव** (पृ.७३५) मु. वैजनाथ, पो. हुमगांव, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१ फोन : ९१६-२५०३५ **यांचेशी त्वरित संपर्क साधावा.** ***

---

**५०व्या अंकाचे स्वागत**

**संस्मरणीय अंक**

हितगुजचा ५०वा अंक हाती आल्यावर हा हितगुजच आहे यावर विश्वासच बसेना. नीट न्याहळल्यावर विश्वास बसला. मुखपृष्ठावर निरनिराळ्या प्रसंगाचे फोटो अत्यंत हुषारीने एकत्र गुंफून मुखपत्राला डौलदार केले आहे. नवीन असून अरविंदांनी सुरेख शैलीत मनोगत दिले आहे. काही कुलबांधवांनी मूळ पुरुषाबाबतची दिलेली माहिती फारच उपयुक्त आहे. मागील अंकांची झलक व तिची मांडणी अप्रतीमच आहे. डॉ. सीमा श्याम यांचा लेख (कथा) सर्वोत्तम. मनोहर दामोदर यांची 'भ्रमंती' म्हाताऱ्यांना उत्साह देणारी. मलपृष्ठावरील ''बंधुभाव'' या मथळ्याला शोभेल. अशा सुंदर चित्राने अंकाची शोभा वाढवली आहे. अशा तऱ्हेने संस्मरणीय झालेला अंक पूर्ण होत आहे हे संपादकाचे कौशल्य अपूर्व.

- **वामन आत्माराम** (पृ.३६६), पुणे

---

# उद्योग प्रवर्तन - काही विचार

***अंबरनाथ, जि. ठाणे येथील प्रतिष्ठानचे सदस्य मनोहर दामोदर (पृ.२७५) यांनी १८.८.२००२ रोजी वा. स. सभेत मांडलेले विचार.***

मला असं सांगावसं वाटतं की उद्योजक म्हणजे जो दुसऱ्याची चाकरी करून दरमहा ठराविक रक्कम कमवतो तो सोडून सर्व! जर आपल्या सर्वांचे प्रयत्न या दिशेने होतील तर? त्याकरता एक सर्व संमत आराखडा तयार करावा. जसे - कोण निराधार आहे? कोण बेकार आहे? लहान लहान कामे करून पैसे जमवणे त्यांना शक्य आहे का? घरोघरी मोठ्या प्रमाणात लागणाऱ्या वस्तू ते बनवू शकतील काय? त्यांना मार्गदर्शन करणारे किती तयार आहेत? ह्यातूनच पुढे मोठे उद्योजक बनतात! आपली सहकारी पतपेढी निघेल काय? त्यातूनच ह्या गरजू लोकांना आर्थिक सहाय्य होईल.

माझे तर असे सांगणे आहे की ह्या करता एक लहान गट तयार करावा - हितगुज तर्फे प्रचार होईलच.

सचोटी व परस्पर विश्वास ह्या दोन गोष्टी पारखूनच मदत कार्य होईल. मला खालील गोष्टी सुचतात त्या मराठे परिवारात (बाजार भावापेक्षा १०% सूट देणे) वितरीत केल्या तरी ह्या कार्याची मुहूर्तमेढ होईल!

१) Detergent साबण बनवणे

२) अत्तरे/spray बनवणे

३) घरोघरी Peticoat/लहान मुलांचे कपडे/ इतर विकणे

४) Electronic वस्तूंची विक्री + दुरुस्ती

५) सीझनल किराणा माल - मार्च एप्रिल - गहू डाळी गूळ. डिसेंबर/जानेवारी - तांदूळ. होलसेल व रिटेल मध्ये ह्या गोष्टीत खूप मार्जिन असते.

ज्यांना आपण मान्यता देऊ त्यांना मराठे प्रतिष्ठानचे ओळखपत्र पण द्यावे.

वरील सर्व गोष्टींकरता मार्गदर्शनाची गरज आहे. असे मार्गदर्शन करणारे आपल्यात आहेत. ह्यापुढेही जाऊन मी सांगेन की जे सध्या उद्योगधंद्यात आहेत त्यांनी प्रतिष्ठान सदस्यांना त्यांच्या तर्फे खरेदीत थोडी सूट द्यावी. त्यासाठी प्रतिष्ठानचे ओळखपत्र पण बनवावे!

आता अजून एक मुद्दा. सामाजिक संस्था रिटायर लोक चालवतात असे नेहमी म्हटले जाते. तरुणांना फायदे कळतात तेच बरोबर आहे. ज्यातून फायदा नाही त्याकडे तरुणांनी लक्ष घालू नये हेच बरोबर! आपण Activity चालू केल्या तर आपले तरुण तरुणी जमतील! बघा माझा आत्मविश्वास मला हेचं सांगतो आहे.

इतर सर्वांचे विचार मला आणखी चालना देतील. ***

Marathe Pratishthan

# विभागीय संमेलन - मिरज (४.८.२००२)

- **विनायक केशव** (पृ.२०), वरळी, मुंबई

२६ फेब्रुवारी २००२ रोजी झालेल्या सांगलीतील कुलबांधवांच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे (पहा हितगुज मार्च २००२, पृ.१०) सांगली, कोल्हापूर व सातारा जिल्ह्यांतील कुलबांधवांचे विभागीय संमेलन दिनांक ४ ऑगस्ट २००२ रोजी मिरज येथील राधा गोविंद हॉलमध्ये शाही इतमामात पार पडले. या प्रसंगी सांगलीतल्या ३६ कुटुंबातील ७२, कोल्हापूरमधील ७ कुटुंबातील १०, पुण्यातून २ आणि मुंबईतून प्रतिष्ठानचे कार्यवाह विनायक केशव आणि कोषाध्यक्ष सी. गो. खांबेटे असे एकूण ८९ कुलबंधू-भगिनी उपस्थित होते.

राधा गोविंद हॉलजवळील रस्त्यावर खुद्द **अरविंदराव व त्यांचे सहकारी सर्वांच्या स्वागताला** हजर होते. राधा-गोविंद हॉल. अरविंदरावांनी मातापित्याच्या स्मरणार्थ बांधलेली भव्य तितकीच सुरेख वास्तु. वास्तु संस्थानातली आहे. जागेची काटकसर मुळीच नाही. 'त्यातल्या त्यात' शब्दयुगुलाला पूर्ण बंदी. प्रवेशद्वाराजवळ सुंदर रांगोळी, स्वागत कक्ष, हॉलमध्ये आराखड्यात रेखाटाव्यात अशा सुंदर पद्धतीने मांडलेल्या शुभ्र रंगाच्या खुर्च्या, साधं पण आकर्षक पद्धतीनी सजविलेलं व्यासपीठ. सर्वच काही कौतुक करण्यासारखं.

ठीक साडेदहाच्या ठोक्याला सर्व उपस्थित हॉलच्या परिसरातील टुमदार गणेश मंदिराजवळ जमले. गणेश वंदन व आरत्या झाल्यानंतर मंत्रपुष्प व समस्त मराठे कुलबांधवातर्फे प्रार्थना करण्यात आली.

दहा वाजून चाळीस मिनिटांनी **अरविंदरावांनी** सर्वांचे स्वागत करून मेळाव्याचे उद्घाटन केले. **आपल्या स्वागतपर भाषणात** अशा तऱ्हेच्या **विभागीय मेळाव्यांचे महत्व विशद** करून सांगताना प्रतिष्ठानसाठी कार्य करावे म्हणजे नक्की काय करावे याची स्पष्ट कल्पना येण्यासाठी असे मेळावे आवश्यक आहेत. उद्योगप्रेरणा उपक्रमाला तरुणांचा सहभाग का नाही याचे काही प्रमाणात उत्तर या मेळाव्यात मिळू शकेल कारण या मेळाव्याचे क्षेत्र सीमित असंते व बऱ्याच कुलबांधवांना व त्यांच्या घरातील तरुणांना आमंत्रित करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संपर्क साधता येतो. प्रतिष्ठानचे कार्यवाह वि. के. मराठे, कोषाध्यक्ष सी. गो. खांबेटे व कर्नल प्रमोदन मराठे (पुणे) यांचा खास उल्लेख करून त्यांनी याबाबत व सर्वसाधारण कार्यपद्धतीवर विचार मांडावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रतिष्ठानचे **कार्यवाह वि. के. मराठे यांनी प्रतिष्ठानची ओळख** अगदी सुरवातीपासून थोडक्यात करून दिली. शिक्षण निधी व वैद्यकीय निधीचा ओझरता उल्लेख करून त्यांनी **उद्योगप्रेरणा या उपक्रमाविषयी विस्ताराने चर्चा** केली. व्याख्याने, मेळावे व मार्गदर्शनपर लेख ही साधने तरुणांना विश्वासात घेण्यासाठी पुरेशी पडत नाहीत. या तरुणांशी प्रत्यक्ष संपर्क साधून व केवळ त्यांचेच छोटे छोटे मेळावे आयोजित करून या उपक्रमाचे महत्व त्यांना पटवून देता येईल, असे त्यांनी सांगितले.

कोषाध्यक्ष **सी. गो. खांबेटे यांनी कुलवृत्तांताच्या संगणीकरणाविषयी** सविस्तर माहिती दिली. पारितोषिकांविषयी विचार प्रकट करताना लाभार्थी विद्यार्थ्यांनी आपण होऊन अर्ज व गुणपत्रिका प्रतिष्ठानकडे वेळेवर पाठवाव्या. तसेच शिक्षण चालू ठेवण्याकरिता आर्थिक मदतीची जरूर भासल्यास विनासंकोच प्रतिष्ठानकडे अर्ज करावा असेहि त्यांनी सुचविले.

पुण्याचे कर्नल प्रमोदन मराठे यांचे मार्गदर्शन फारच चिंतनीय होते. योगायोगाने

## अनुकरणीय

दि. १८ ऑगस्ट २००२ रोजी भरणाऱ्या मराठे प्रतिष्ठानच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस शुभेच्छा! सभेत खालील मुद्यांचा विचार व्हावा.

१) **प्रतिष्ठानची आजीव सभासद संख्या वाढविणे** : प्रतिष्ठानच्या आजीव सभासदांची यादी वाचल्यावर असे लक्षात येते की बहुतांशी 'पुरुष'च आजीव सभासद झाले आहेत. वास्तविक प्रत्येक पुरुष सभासदाबरोबर त्याची पत्नी आजीव सभासद झाली तर विशेष प्रयत्न न करता आ. सभासद संख्या निदान ७५% वाढेल. याबाबतीत फक्त 'पुरुषच' सभासद होऊ शकतात अशी समजूत असेल तर तसे आवाहन करून ती दूर करता येईल.

२) **हितगुज वाटप** : ५०वा अंक या भागांतल्या २८ सभासदांना वितरित करण्यात मला काही अडचणी आल्या नाहीत. **आमच्या केंद्रातील सभासदांची तिमाही मिटींग घ्यावी व त्यावेळी अंक वाटप करावेत अशी सूचना आली आहे त्यामुळे प्रत्येक तिमाहीमधे सर्वजण एकत्र येतील.** अशी योजना इतरत्र करणेही योग्य होईल.

- **विठ्ठल महादेव** (पृ.२३५), सांगली.

*(स्त्रियांना सभासद होण्याचे आवाहन वार्षिक सभेत करण्यात आले. उत्स्फूर्त प्रतिसादहि आढळला.*

*हितगुज वाटपाचा तिमाही सभेशी मेळ घालण्याची कल्पना उत्तम. पुण्यांतल्या कार्यकर्त्यांनी याबाबत जरूर विचार करावा. तसेच मुंबईची विविध उपनगरे, गोवा, बेळगांव, इंदूर, बडोदा-अहमदाबाद अशा केंद्रातहि याबाबत विचार व्हावा.*

*विठ्ठल महादेव यांनी कुलवृत्तांत अद्ययावत करण्याच्या दृष्टीने आपल्या कुटुंबीयांची सुधारित माहिती पाठवली आहे. इतरांनीहि यांचे अनुकरण केले तर कुलवृत्तांत संस्करणाचे काम निश्चितच सुकर होईल. - संपादक)*

Marathe Pratishthan

भगिनीवर्गाची व तरुणांची उपस्थितीसुद्धा लक्षणीय होती. आपल्या भाषणात **प्रमोदन मराठे यांनी पुढील विचार व्यक्त केले.** उद्योग प्रेरणा हा खरोखरच प्रेरणादायक उपक्रम असताना तरुणांचा सहभाग का नाही हा मोठा गंभीर प्रश्न आहे. पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन (workshop) याचा सांगोपांग विचार करावा.

**व्यक्तिमत्व विकासाची कल्पना** पालकांनी व पाल्यांनीसुद्धा जाणून घेतली पाहिजे. नुसती शिकवणी ठेवून वा क्लासमध्ये पाठवून पालकांनी हात झटकून टाकू नयेत. पालक व विद्यार्थी यांचा सतत संपर्क असणे आवश्यक आहे. T.V. वरचे गेमस् विद्यार्थ्यांचा वेळ फुकट घालवतात. ठराविक अभ्यास विषयांकडेच ओढा आहे. ज्ञानसंपादनाची शास्त्रीय बैठक फारच थोडे जाणतात. **लक्ष केंद्रीत करणे हा एक अभ्यास आहे.** पण याबाबतीत मार्गदर्शन नाही. प्रतिष्ठानने तरुणांना लक्ष कसे केंद्रित करावे याच्या मार्गदर्शनाची व्यवस्था करावी. म्हणजे तरुणांचा सहभाग वाढेल. त्याला आपल्यासाठी प्रतिष्ठानकडे काही आहे याची जाणीव झाली पाहिजे. मुलांना चार लोकात बोलता येत नाही. मग हुशारीचा काय उपयोग ? आपण या तरुणांना प्रथम चारचौघात विचार मांडायला शिकवलं पाहिजे. आयुष्याच्या निरनिराळ्या टप्प्यात मार्गदर्शनाची अतिशय जरूरी भासते.

आयुष्य यशस्वी करण्यासाठी, सुखी करण्यासाठी **तरुणांनी स्वत: विचार केला पाहिजे.** मी एक लष्करी अधिकारी. पण निवृत्त झाल्यावर नाना उद्योगांचा अभ्यास करून मी आता तयार कपड्यांचा व्यवसाय करतो. मी स्वत: विक्रीकरता प्रदर्शने आयोजित केली व मार्केट निर्माण केले. जवळ जवळ निरनिराळ्या ३६ उद्योगांचा मी बारकाईने अभ्यास केला. आपण तरुणांना विश्वासात घेऊन त्यांना असे विचार करण्यास प्रवृत्त केले पाहिजे. उद्योगाचेसुद्धा एक शास्त्र आहे. प्रत्यक्ष उद्योग करण्याअगोदर तरुणांनी उद्योग प्रवण होणे आवश्यक आहे. उद्योगांचा विचार सतत केला पाहिजे. भांडवलाची भीती व्यर्थ आहे. मी उद्योग सुरू केला तेव्हा कुठे मोठे भांडवल माझ्याजवळ होते ? सेवा उद्योगांना तर जुजबी भांडवल पुरते. आपली बुद्धिमत्ता, आपले कौशल्य हेच आपले भांडवल असते.

**आपत्कालीन उपाययोजनेवरहि त्यांनी भाषण संपवताना काही विचार मांडले** (या विषयावरचा त्यांचा सविस्तर लेख हितगुजच्या जून २००२ च्या अंकात दिलेला आहे.)

> **५०व्या अंकाचे स्वागत**
>
> **कष्टप्रद, कौतुकास्पद प्रवास**
>
> हितगुजचा ५०व्या अंकापर्यंतचा कष्टप्रद पण धैर्याने केलेला प्रवास कौतुकास्पद. 'झलक मागील अंकांची' मधील चौकटी वाचनाची रंगत वाढवतात. डॉ. सौ. सीमा श्याम यांची 'प्रारंभ' कथा आवडली. 'मनोगत' मधे मा. अध्यक्षांनी व्यक्त केलेले 'आपली पुढची पिढी इतकी उदासीन कां बरं' हे शल्य बोचणारं, गांभीर्याने विचार करायला लावणारं. राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळवल्याबद्दल कलाध्यापिका कुमुद मराठे-डोके यांचे अभिनंदन. त्यांच्या 'बंधुभाव' या चित्रांतील प्रत्येकाचे वैशिष्ट्य म्हणून पानांमध्ये शब्द असते तर चित्राची शोभा वाढली असती. भरताचे प्रेम, लक्ष्मणाचा त्याग, हनुमंताची निष्ठा, सीतेचे समर्पण, रामाचा आदर्श. चित्रात हनुमंत नाही म्हणून ते अपुरे वाटते.
>
> **- सदानंद प्रभाकर विद्वांस** (पृ.६५८),
> मुद्रे बुद्रुक, कर्जत

या मेळाव्याला **अमित मराठे** (पृ.४८) हा तरुण उपस्थित होता. त्याचे भाषण म्हणजे तरुणांना आव्हानच होते. त्यांनी स्वत:चे अनुभव सांगताना **बाजारपेठेविषयी सल्लामसलत हा त्यांचा उद्योग असल्याचे सांगितले.** मी स्वत:ला या क्षेत्रात झोकून दिले. खूप मेहनत केली. पहिल्याच वर्षाला मी ४४ लाखाची विक्री केली. आपणाला सर्व काही करता येईल. मला माझ्या क्षेत्रात अनेक ब्राह्मण तरुण भेटले. सेवा उद्योगात बुद्धी वापरून लाखो रुपये कमवता येतात. मला यावेळी पाच मेकॅनिकल इंजिनियरची जरूरी आहे. आहे कोणी तयार ? मला मेहनत करणाऱ्या तरुणांनी भेटावे. मी त्यांना महिना कमीतकमी दहा हजार रुपये मिळवून देणारा मार्ग दाखवीन.

मिरजेचे प्रख्यात उद्योजक व **अरविंदरावांचे पुतणे श्री. रविंद्र** यांनी त्यांनी नवीन सुरू केलेल्या उपक्रमाविषयी (मंगल कार्यालय) माहिती दिली. मराठे कुलबांधवांना मी खास १० टक्के सवलत देईन असे जाहीर आश्वासन दिले. केवळ २५ हजार रुपयात आम्ही सर्व विवाह खर्च भागवून १०० माणसांची भोजन व्यवस्थासुद्धा करतो असे सांगितले.

कोल्हापूरचे प्रतिष्ठानचे कार्यकर्ते **नंदकुमार मराठे** यांनी मिरज येथे अखिल भारतीय अधिवेशन भरवावे अशी सूचना केली.

त्यानंतर **श्री. विठ्ठलराव मराठे यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार** करण्यात आला. तसेच अध्यक्षांनी प्रतिष्ठानचे कार्यवाह, कोषाध्यक्ष व प्रमोदन मराठे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व अध्यक्षांनी समारोपाचे भाषण करून मेळावा समाप्त झाला.

या मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे सभास्थानी श्री. जयंत मराठे यांनी उद्योग प्रेरणा या उपक्रमाला रुपये दहा हजार व भास्कर गो. मराठे यांनी रुपये पाच हजार एवढ्या देणग्या जाहीर केल्या.

मेळाव्यानंतर सहभोजनाचा कार्यक्रम पार पडला. अगदी पेशवाई थाटाचे भोजन मिरजकरांनी आयोजित केले. श्री. रविंद्र मराठे यांच्या **सौभाग्यवती अलका मराठे यांनी भोजनाची व्यवस्था केली होती.** प्रतिष्ठानतर्फे मी त्या उभयतांचे आभार मानले.

संध्याकाळी मुंबईकडे जाणाऱ्या गाडीत बसताना एवढ्या चांगल्या माणसांचा सहवास अधिक मिळाला असता तर मजा आली असती असं सारखं वाटत होतं. अशी जवळीक प्रस्थापित होणं हाच विभागीय मेळाव्याचा हेतू असतो. या दृष्टीने सांगली-मिरज विभागीय मेळावा हा यशस्वी झालाच पण आदर्शसुद्धा होता. ***



Marathe Pratishthan

# मोहाचा क्षण

- **शशांक श्रीधर** (पृ.३९६), वेंगुर्ले

***हजारो लोकांच्या मरणाची निश्चिती करण्याच्या रतनशेटच्या पापात त्याला सहभागी व्हायचं नव्हतं. बराच वेळ तो विचार करत होता. शेवटी त्याच्या संस्कारक्षम मनाने फाईलवर सही न करण्याचा निर्णय घेतला.***

सकाळी उठल्या उठल्या सुधाने कटकट सुरू केली. ''अहो.... तुमच्या वडिलांना जरा सांगून ठेवा. आज तर त्यांनी विक्षिप्तपणाचा कळस केलाय. पाऊण तास झाला तरी बाथरुममध्ये आंघोळ करत आहेत. पाणी जायची वेळ झाली. अजून सगळ्यांच्या आंघोळी व्हायच्या आहेत. त्यांना जरा जागं करा.''

समीरनं सांगितल्यावर वडील बाहेर आले. ऑफीसला जायला उशीर होईल म्हणून पत्नीच्या बडबडण्याकडे दुर्लक्ष करीत घाईघाईनेच अंगावर दोन तांब्ये ओतून समीर ऑफीसला पळाला.

मुंबईत दोन खोल्यांच्या घरात राहणार समीरचं मध्यमवर्गीय कुटुंब. समीर, त्याची पत्नी सुधा, दोन मुलं आणि म्हातारे वडील. एवढे सगळेजण त्या दोन खोल्यात राहत असत. घरात असंख्य समस्या ठाण मांडून बसलेल्या. त्यात परत समीर आई-वडिलांनी केलेले संस्कार विसरला नव्हता. त्या संस्कारांना जपत आणि येणाऱ्या प्रत्येक समस्येला तोंड देत जगणं दिवसेंदिवस कठीण होत चाललं होतं. त्यात यंदा मोठ्या मुलाची बारावी. त्याचं पुढचं शिक्षण, त्याचं करीयर. एवढ्या सगळ्यांचं एकट्याच्या पगारात भागणार तरी कसं? याच विचारात तो ऑफीसमध्ये पोचला. ऑफीसमध्ये येताच अनेक कामे पेंडींग पडलेली होती. त्यातल्या त्यात प्रामाणिकपणे आणि सचोटीने वागणारा असा तोच एक अधिकारी होता.

ऑफीस सुटायला आता अर्धाच तास शिल्लक होता. तेवढ्यात रतनशेटचा एक माणूस समीरकडे आपल्या साहेबांचं प्रपोजल घेऊन आला. हल्ली हे रतनशेटचं नवं दुखणं त्याच्या पाठीमागे लागलं होतं. यापूर्वी रतनशेटने बांधलेल्या कित्येक अनधिकृत इमारती निकृष्ट बांधकामामुळे पडल्या होत्या आणि त्यात हजारो लोकांचे बळी गेले होते. पण समीर अशा अनधिकृत बांधकामांना डोळे झाकून परवानगी देणाऱ्यांपैकी नव्हता. म्हणूनच समीरने फाईलवर सही करण्यास नकार दिला.

> **५०व्या अंकाचे स्वागत**
>
> **ज्येष्ठ साहित्यिकानं केलेलं कौतुक**
>
> हितगुजचा ५०वा विशेषांक उत्तम तऱ्हेने संपादिला आहे. त्यानिमित्त व आतापर्यंत चे सर्व अंक चांगले काढल्याबद्दल संपादक ल. शं. यांचे खास अभिनंदन आम्ही मिरज मेळाव्यात केले ते त्यांचेपर्यंत पोचवावे. या अंकातील श्री. भा. ल. महाबळ यांच्या प्रतिक्रिया म्हणजे ज्येष्ठ साहित्यिकानं केलेलं कौतुक आहे.
>
> - **विठ्ठल महादेव** (पृ.२३५), सांगली

रतनशेटच्या माणसाने बहुतेक समीरची, त्याच्या कुटुंबाची चांगली माहिती काढली होती. तो म्हणाला, ''हे बघा साहेब, असे लगेच नाही म्हणू नका. जरा नीट विचार करून काय ते सांगा. त्यात परत यंदा तुमच्या मुलाची बारावी आहे. त्याच्या करीयरसंबंधी तुम्ही काहीतरी विचार केलेला असेलच की? तेव्हा पुन्हा एकदा नीट विचार करा. या फाईलवर सही केलीत तर जुहूच्या पॉश एरियात एक आलिशान फ्लॅट तुमची वाट पाहतो आहे.''

आता मात्र समीर चिडला, ''हे बघा, तुम्ही मला लाच देण्याचा विचार सुद्धा मनात आणू नका. तुम्ही चालते व्हा माझ्या ऑफीसमधून.''

''साहेब असे एकदम चिडून जाऊ नका. जरा डोकं थंड ठेवून विचार करा, यात तुमचाच फायदा आहे आणि अशी अनेक प्रपोजल्स याच वर्षात तुमच्या समोर सहीला येणार आहेत. तेव्हा नीट विचार करूनच निर्णय घ्या. आज तुम्हाला पण गरज आहेच की.''

''ठीक आहे, तुम्ही उद्या या, मग बघू आपण काय ते...'' समीर. आजपर्यंत आपण आपल्या संस्कारांना जपत आलो. तरी पण आपण त्या माणसाला 'उद्या या' असं कसं म्हणालो हेच समीरच्या मनाला बोचत होतं. कुठेतरी समीरच्या मनात मोह निर्माण झाला होता.

थोड्या उशीरानेच समीर घरी आला. सुधानं चहा दिला. पण आज त्याचं कशातच लक्ष लागत नव्हतं. आई-वडीलांचं काहीतरी भांडण होणार हे लक्षात येऊन मुलगा सतीश जेवण झाल्यावर 'मित्राकडे अभ्यासाला जातो' असं सांगून घराबाहेर निघून गेला. सुधाने विषय काढलाच. समीर ऑफीसमधे घडलेलं सगळं सांगणारच होता. पण त्याने 'ऑफीस' असा शब्द उच्चारताच सुधाने लगेच भांडणाचाच पवित्रा घेतला. ''हे बघा तुमची ही ऑफीसमधली टेन्शन्स कधी बर संपणार आहेत. सदासर्वदा तोंड आपलं मेलं दुर्मुखलेलं. आठवड्यातून मिळणारी एखादी सुट्टी. ती सुद्धा सगळ्या जगाच्या चिंतेत घालवायची, कुठे जाणं नाही की फिरणं नाही.''

'हे बघ माझं जरा ऐकून घेशील का? सुधा........'

''मी तुमचं काहीही ऐकून घेणार नाही. गेली २० वर्ष तुमचं तेच तेच तत्वज्ञान ऐकून मला आता कंटाळा आलाय. अहो २० वर्ष झाली आपल्या लग्नाला. तरी आम्ही या टीचभर दोन खोल्यांच्या खुराड्यांतच मरायचं. तुमच्या हाताखाली कामं करणारी लोकं बघा कशी आलीशान फ्लॅटमध्ये राहत आहेत आणि आम्ही संस्कार नीतिमत्ता यांच्याच जंजाळात अडकून राहायचं. त्यात परत तुमचे वडील इथं येऊन बसलेत. त्यांचे आजार, औषध-पाणी करण्यातच आमचा अर्धा पगार संपतो. उरलेला अर्धा पगार घरभाडे, पेपरवाला, मुलांच्या फिया यांच्यात जातो. महिन्याचं बजेट ठरवताना नाकीनऊ येतात हे तुम्हाला सुद्धा माहिती आहे. मग तुम्हाला

Marathe Pratishthan

संस्काराच्या गोष्टी सुचतातच कशा हो?''

''सुधा...... गप्प बस जरा,'' सतीश ओरडला.

''उगीच ओरडू नका. खरं तेच बोलतेय मी. आमचं मेलं जाऊ दे. पण मुलांच्या भवितव्याचा काही विचार केलाय का तुम्ही? यंदा सतीशची बारावी आहे. त्याची ॲडमिशन, त्याचं पुढचं शिक्षण याचा जरा तरी विचार केलाय का? अहो तुमच्या त्या संस्कारांचा आणि नीतिमत्तेचा जगाच्या बाजारात काहीही उपयोग होणार नाहीए.''

रात्रीचे अकरा वाजत आले तरी सतीशला झोप येत नव्हती. त्याच्या द्विधा मन:स्थितीमुळे तो अस्वस्थ होत होता. आजवरच्या आपल्या संस्कारांचा, शिकवणुकीचा जगात खरंच काही उपयोग नाहीए का? आणि मीच का हे जग बदलायचा ठेका घेतलाय? माझ्या ऑफीसमधले सगळेच असं करत आहेत. मग यात वाईट असं काय आहे? काहीच तर नाही. असे असंख्य विचार समीरच्या मनात थैमान घालत होते. समीरलाही दिवसेंदिवस मन मारून जगण्याचा कंटाळा आला होता. एकट्याच्या पगारात पाच माणसांचं जेमतेम भागत होतं. एकालाही आपला छंद जोपासता येत नव्हता. मोठ्या मुलाला तबला शिकायचा होता, तर धाकट्याला बॅडमिंटनची आवड होती. केवळ समीरच्या अशा वागण्यामुळे एकालाही आपली हौस पुरी करता येत नव्हती. क्षणभर या सगळ्याला आपणच दोषी आहोत असं समीरला वाटू लागलं. शेवटी त्याने मनावर दगड ठेवून फाईलवर सही करण्याचा निर्णय घेतला.

दुसऱ्या दिवशी बसमधून ऑफीसला जात असताना शेजाऱ्याच्या पेपरवर त्याची नजर गेली. पहिल्याच पानावर रतनशेटच्या कंस्ट्रक्शनने ५ वर्षापूर्वीच बांधलेली इमारत कोसळून शेकडो माणसे ठार झाल्याची बातमी छापली होती. समीर त्याच विचारात ऑफीसात पोचला. थोड्या वेळानंतर रतनशेठचा माणूस आला. फाईल सही करायला समोर येताच तो पुन्हा विचारात पडला. आजवर जोपासलेली जीवनमूल्यं क्षणार्धात पायदळी तुडवून त्या अनधिकृत बांधकामाला परवानगी देणं त्याला जमत नव्हतं.

हजारो लोकांच्या मरणाची निश्चिती करण्याच्या रतनशेटच्या पापात त्याला सहभागी व्हायचं नव्हतं. बराच वेळ तो विचार करत होता.

शेवटी त्याच्या संस्कारक्षम मनाने फाईलवर सही न करण्याचा निर्णय घेतला. ***

---

# पेन्शनचा फोटो

**- विठ्ठल महादेव** (पृ. २३५), विश्रामबाग, सांगली.

***आता म्हातारपणी निघालेत फोटो काढायला! वन्सच्या लग्नात माझा एकुलता एक पाठमोरा फोटो निघाला होता. त्याची निगेटिव्ह उलटी करून माझा समोरून फोटो काढून आणा म्हणून चार वेळा सांगून ऐकलंत का माझं?***

''रावसाहेब, आता पेन्शनचे काम सरकारने फार सोपे करून टाकले आहे. सर्व फॉर्म विकत मिळतात. ते भरून पाठवले, की दोन महिन्यांत पेन्शन मंजूर होते. तुम्ही फक्त तुमच्या दोघांच्या एकत्र काढलेल्या फोटोंच्या चार प्रती आणून द्या, बाकी सर्व काम मी पाहतो. काही काळजी करू नका.''

ऑफिसमधल्या संबंधित आस्थापना लिपिकाने एवढी ग्वाही दिल्यानंतर माझी पेन्शनबाबतची काळजी दूर झाली. पेन्शन, ग्रॅच्युईटी, विकलेल्या पेन्शनच्या भागाची किंमत, शिल्लक रजा विकून आलेली रक्कम इ. मिळून सुमारे दीड लाख रुपये मिळणार होते. त्याचे महिना अंदाजे दीड हजार. त्याशिवाय दरमहा मिळणारी पेन्शन इ. हिशेब कागदावर लिहून काढला व कागद खिशात ठेवून घरी आलो.

घरी नेहमीप्रमाणे स्वागत झाले. स्वयंपाकघरातून कपबशीच्या येणाऱ्या आवाजावरून चहाची तयारी चाललेली होती हे समजून आले. चहा होईपर्यंत दम खाऊन मग फोटोचा विषय काढावा, असे ठरवून मनातल्या मनात पुन्हा एकदा दीड लाखाच्या हिशेबाची उजळणी केली.

चहा घेऊन झाल्यावर जरा प्रेमळ आवाजात पत्नीला हाक मारली, ''अहो, आज जरा बाजारात जायचे आहे बरं का.''

एरवी जरी पत्नीला ये-जा म्हणत असलो तरी एखादे काम तिच्याकडून खुषीने करून घ्यावयाचे असेल तर अहो जाहो म्हटलेले बरे असते, असा माझा अनुभव आहे. माझे 'बाजारात जायचे आहे' हे वाक्य पुरे व्हायच्या आतच अपेक्षित उत्तर आले, ''मग जा की, मला कशाला सांगताय? जेवायला लवकर या म्हणजे झालं. सकाळपासून मी एकटी राबतेय. संध्याकाळी जरा मदत कराल म्हणावे, तर आता गावात जायचं फॅड काढलय.''

उत्तर अपेक्षितच होतं. कारण गेल्या तीस वर्षात सरळ उत्तर मिळाल्याचे प्रसंग फार थोडे होते. अपेक्षित उत्तर येणार हे गृहीत धरून मी पुढील चाल करण्याची तयारी ठेवलीच होती.

'अहो, माझ्या कामाला जायचे नाही काही. आपण दोघांनी जायचे आहे आणि दोघांचा फोटो काढायचाय, तो फोटो.....'

माझे वाक्य पुरे व्हायच्या आतच माझ्यासमोर येऊन कमरेवर हात ठेवून ती म्हणाली, ''इश्श, माझा कशाला फोटो

## चाकोरीबाहेर

गोव्यांतील सभासद कालिदास बाळकृष्ण यांचे पत्र आले. तारीख पुढीलप्रमाणे लिहिली होती. ९-८-२००२ (चले जाव स्मृतिदिन).

राष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाच्या/प्रसंगांची जातांजातां आठवण करून देण्याची 'चाकोरीबाहेर'ची ही पध्दत अनुकरणीय नाही वाटत आपल्याला?

*(याबाबत जून २००२ हितगुज मधील पृ. ३२ पहावे. **सभासदांकडून 'चाकोरीबाहेर' सदरासाठी मजकूर अपेक्षित आहे. - संपादक)***



Marathe Pratishthan

काढताय? मी मुळीच यायची नाही. माझा चेहरा फोटोग्राफिक नाही, असे सर्वजण म्हणतात ना? मग कशाला आता माझा फोटो काढायला निघालात?''

''अहो फोटोग्राफिक नाही फोटोजेनिक. म्हणजे काय आहे काही लोकांचे चेहरेच असे असतात, की चांगला फोटोग्राफर आणला तरी त्यांचे फोटो चांगले येत नाहीत.'' मी समजूत घालायचा प्रयत्न केला.

''हे बघा ते फोटोग्राफिक असू दे नाहीतर फोटोजेनिक असू दे. मी एकदा सांगतलय. मी फोटो काढायला येणार नाही. तरुणपणी जरा हौसमौज असते. तेव्हा एकदा तरी फोटो काढलाय का? तुम्हाला हौस म्हणून नाहीच मुळी. आता म्हातारपणी निघालेत फोटो काढायला. वन्सच्या लग्नात माझा एकुलता एक पाठमोरा फोटो निघाला होता. त्याची निगेटिव्ह उलटी करून माझा समोरून फोटो काढून आणा म्हणून चार वेळा सांगून ऐकलंत का माझं? नाही म्हणायला आमच्या मधूच्या (तिचा भाऊ) लग्नात तिकडच्या मंडळींनी मुद्दाम सांगून माझा फोटो काढला होता. तेवढाच माझा फोटो. मधूच्या सासुरवाडीची माणसेच चांगली. चांगली माणसं मिळायला भाग्य लागतं.'' (हा आम्हाला टोमणा).

आता हे प्रकरण वेगळेच वळण घेऊ लागले होते. माझ्या बहिणीच्या लग्नात तिच्या सासरची माणसे व्हीआयपी. तेव्हा हिचा पाठमोरा फोटो आला होता. त्या फोटोची निगेटिव्ह उलटी करून प्रिंट करा म्हणजे माझा समोरून फोटो येईल, असे मला हिने सांगितले होते. त्यावर मी फोटोग्राफरकडे जाऊनही आलो होतो. फोटोग्राफरने असे करता येत नाही, असे सांगून मला परत पाठवले होते. अर्थात फोटोग्राफरने असे सांगितल्यावर मी काय करणार? तिला येऊन सांगितले तर म्हणाली, ''न करता यायला काय झालं? माणसं चंद्रावर जायला लागली, कॉम्प्युटरच्या मदतीने वाटेल ते करता येऊ लागले व तुम्हाला साधा पाठमोरा फोटो समोरून काढता येत नाही? त्या वेळेला सर्व दागिने होते. आता त्यातले चार आणे तरी राहिलेत का अंगावर?''

अशी ही पाठमोऱ्या फोटोची हकिगत. आता मधूच्या लग्नातल्या फोटोबाबत बोलायचं तर ही पंक्तीमधे भावाच्या शेजारी जाऊन बसली. ती पडली नव्या नवरीची नणंद! तिला कोण उठवणार? फोटोग्राफर जरा बुचकळ्यात पडलाच होता. पण नवऱ्या मुलीच्या भावाने जरा व जेवढा येईल तेवढा काढा, असे फोटोग्राफरच्या कानात सांगितले. (तो पीडल्यूडीत स्टोअर कीपर होता. त्याला लिलावाच्या जाहिरातीतील 'जसे आहे जेथे आहे' ही फ्रेज पाठ होती) तेव्हा त्या फोटोग्राफरने हिचा अर्धा फोटो काढला. पण तेवढ्यावर ती खूष होती. कारण अर्धा असला तरी तो मानाचा फोटो होता ना!

आज फोटो काढणे जरूर होते. विषय एवढ्यावर सोडून चालणार नव्हते. म्हणून मी पुढे म्हणालो, ''हे बघा, झाले का तुमचे बोलून. हा विषय कधीच संपला आहे. पाठमोऱ्या फोटोचा विषय पुन्हा पुन्हा कशाला काढता?''

''पुन्हा पुन्हा काढते म्हणजे काय काढणारच. ज्याचा अपमान होतो त्यालाच ते कळते'', असे पुटपुटत ती आत निघाली होती. तिला थांबवून मी म्हणालो, ''अहो माझं जरा ऐका. हा फोटो काढायचा आहे तो पेन्शन पेपर्सला लावून शासनाला पाठवायचा आहे त्यामध्ये दोघांचा फोटो लागतो.'' म्हणजे पती मेल्यावर पेन्शन बायकोला मिळते असे म्हणून तिला पुढे बोलायची संधी न देता मी पेन्शन, ग्रॅच्युईटी, रजेचा पगार इ. मिळून दीड लाख रुपये कसे मिळणार आहेत ते सांगितले. दीड लाखाचा आकडा ऐकून म्हणा अगर फोटोचे महत्त्व पटल्यामुळे म्हणा ती फोटो काढायला तयार झाली व दुसरे दिवशी फोटो काढायचे ठरले.

फोटो काढायचाच व आता पूर्ण फोटो निघणार या उत्सुकतेने दुसऱ्या दिवशी मी ऑफिसातून घरी यावयाच्या आत ती जणू लग्नाला जायचे आहे, अशा तयारीने मेकअप करून बसली होती. रिक्षातून जाताना कोणत्या फोटोग्राफरकडे फोटो काढायचा त्यावर चर्चा झाली. माझ्या दृष्टीने लवकरात लवकर जो फोटोग्राफर फोटो देईल त्या स्टुडिओमध्ये फोटो काढणे जरूर होतो. परंतु तिने कधीतरी कोणाच्या तरी तोंडातून काही स्टुडिओची नावे ऐकली होती. तेवढीच तिला माहीत होती. ती म्हणाली, ''त्या हनीमून स्टुडिओमध्ये जाऊ. परवा शेजारच्या नलूचा डोहाळ जेवणाचा फोटो छान काढला होता आणि तो पण चंद्रावरचा!'' त्या

**५०व्या अंकाचे स्वागत**

### ऋणनिर्देश

जून २००२ च्या 'हितगुज' सुवर्णमहोत्सवी अंकात माझे खापर पणजोबा कै. श्री. महादेव व्यंकटेश विद्वांस यांचा अत्यंत अभिमानास्पद असा परिचय वाचायला मिळाला. आम्ही अत्यंत आनंदित झालो.

- **नितीन गोविंद विद्वांस** (पृ. ६२६), ठाणे

### सर्वांगसुंदर अंक

अंक सर्वांगसुंदर झाला आहे-सजावट व आशय या दोन्ही अंगांनी. आपले मन:पूर्वक अभिनंदन

- **कालिदास बाळकृष्ण** (पृ. ५४१), ढवळी, फोंडा, गोवा.

**५०व्या अंकाचे स्वागत**

### वाचनीय व संग्राह्य अंक

हितगुज जून २००२ च्या सुवर्णमहोत्सवी अंकातील मांडणी, जुळवणी, छायाचित्रे व अनेक कुलबंधू मान्यवरांचे लेख यामुळे हा अंक वाचनीय व संग्रही ठेवण्याजोगा तर आहेच, परंतु त्याबरोबर मागील २० वर्षातील विविध घटनांचा आढावा, माहिती आणि प्रगती यांचा सहजसुंदर आलेख या अंकातून प्रतिबिंबित होत आहे. मुखपृष्ठ, मलपृष्ठ, हितगुजचे आरसे, ५०व्या अंकानिमित्त हे व इतर अनेक सदरे, बरेच कांही सांगून जातात, असे मला वाटते.

- **प्रभाकर गजानन** (पृ. ३९०), पुणे.

Marathe Pratishthan

स्टुडिओचे नाव हनीमून स्टुडिओ नसून फक्त मून स्टुडिओ होते हे मला माहीत होते. पण मला विषय वाढवायचा नव्हता.

स्टुडिओमध्ये मालकाने आमचे स्वागत केले. आम्ही त्यांना दोघांचा एकत्र फोटो काढायचा आहे असे सांगितले व फोटो लवकर मिळावा म्हणून आम्हाला गावाला जायचे आहे व फोटो चार दिवसांत पाहिजे, अशी थाप मारली. फोटोच्या चार कॉपीज पाहिजेत, असे सांगितल्यावर फोटो पेन्शनसाठी पाहिजे आहे हे त्यांनी ओळखले व 'पेन्शनसाठी पाहिजे आहे ना, उद्या संध्याकाळी घेऊन जा', सांगितले. त्याच्या दृष्टीने पेन्शनचा फोटो कसाही असला तरी चालतो, असे असावे. त्याने मी पेन्शनीत जाणार हे ओळखल्यावर मला जरा कसेसेच झाले. पेन्शनीत निघणाऱ्या माणसाला दुसऱ्यांनी तसे म्हटले म्हणजे आपण म्हातारे हे याला कळले बरं का असे वाटून कसेसेच होते.

आम्हाला आत नेऊन फोटोग्राफरने कॅमेऱ्यासमोर उभे केले व 'साहेब जरा जवळजवळ उभे राहा' असे सांगितले. त्याने चार-पाच वेळा सांगूनही सौ. मला खेटून उभे राहायला तयार होईना हे पाहून तो आमच्याजवळ आला व माझ्या खांद्याला धरून मला सौ. जवळ सरकवले व तो कॅमेरा व लाईट ॲडजेस्ट करायच्या तयारीला लागला. तो कामात गुंतला आहे हे बघून हिने मला हळूच डिवचले व सांगितले, 'तुमच्या लक्षात आहे ना, फोटोग्राफरने स्टडी प्लीज म्हटल्यावर आपण तोंडाने चीज असे म्हणायचे असते.'

हसरा चेहरा नसणाऱ्या माणसांनी फोटो हसरा यावा म्हणून 'चीज' म्हणायची ट्रीक मला माहीत होती. (तुम्ही हे वाचता वाचता हळूच करून बघा) परंतु हा साधा सरळ फोटो होता. त्यात चेहरा हसरा यावा अशी अपेक्षा नव्हती. पेन्शनीत जाणाऱ्या माणसाचा चेहरा हसरा येईलच कसा! पण कुठे वाद घालायचा. तिला काय 'चीज' म्हणायचे ते तिने म्हणावे व आपण गंभीरपणे उभे राहावे, असे ठरवून मी गप्प राहिलो.

फोटोग्राफरने 'कॅमेऱ्याकडे पाहा, स्टडी प्लिज,' म्हणून फ्लॅश चमकला व 'थांबा हं, आणखी एक स्नॅप घेतो' म्हणून आम्हाला थांबवून ठेवले. तेवढ्यात सौ. ने मला विचारलेच 'चीज म्हणालात ना?' परंतु उत्तर द्यायची संधी फोटोग्राफरने दिली नाही. पुन्हा एकदा फोटोग्राफरचे 'स्टडी प्लिज' झाले व फ्लॅश चमकला. फोटो उद्या संध्याकाळी घेऊन जा, असे फोटोग्राफरने सांगताच एक प्रत जास्त काढा बरं का असे सौ. ने फोटोग्राफरला सांगितले

दुसरे दिवशी चार कॉपीज ऑफिसात नेऊन दिल्या व राहिलेली एक प्रत घेऊन घरी आलो. घरी येताना परत एकदा आता पेन्शन पेपर्स गेले. दीड लाख मिळणार, असे विचार चार वेळा मनात येऊन गेले.

> **५०व्या अंकाचे स्वागत**
>
> **मूल्यशिक्षण**
>
> हितगुज सुवर्णमहोत्सवी अंक मिळाला. आकर्षक व वाचनीय. आदर्श पालक, स्वावलंबन, योगायोग, एक हृद्य आठवण, गुरु यासारखी माहिती मूल्यशिक्षणाचे दृष्टिकोनातून उपयुक्त. त्याचप्रमाणे अविस्मरणीय सागर सफर, मराठे प्रतिष्ठान आणि मी, मूळपुरुष वगैरे लेख फारच वाचनीय. हितगुजची रचना, रंग व लेखनाचा टापटीपपणा मोहक वाटला.
>
> **- भास्कर दत्तात्रय** (पृ.२१),
> वाडा, जि. सिंधुदुर्ग

घरी येताच 'फोटो मिळाले का' असा अपेक्षित प्रश्न झाला. त्यावर 'फोटो मिळाले, पेन्शन पेपर्स घेऊन स्पेशल माणूस मुंबईला गेला. आता महिनाभरात पेन्शन, ग्रॅच्युईटी मंजूर' असे म्हणत खिशातली जादा कॉपी सौ. च्या हातात दिली.

फोटो चांगला आला होता. म्हणजे आम्ही आहोत तसाच आला होता. सौ. ने फोटो हातात घेताच 'सगळं मुसळ केरात, ब्लॅक अँड व्हाईटच काढला का शेवटी! आमचा काय कलर फोटो निघाला नसता? चार पैसे जास्त पडले असते. तेवढे बरे वाचवलेत. आमचे नशीबच खोटे' वगैरे रेकॉर्ड सुरू केली.

पेन्शन पेपर्सना ब्लॅक अँड व्हाईटच फोटो लागतो, असे म्हणून मी तिची समजूत काढणार होतो. पण ती काही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हती. नसेना का? माझे काम झाले होते.

(रविवार सकाळ, पुणे ७.३.१९९३ वरून साभार)

***

## दोन कविता - तरुणांच्या

*जून २००१ च्या अंकांत तरुणांसाठी लेखन स्पर्धा जाहीर करण्यात आली होती. पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने ही स्पर्धा रद्द करण्यात आली. या स्पर्धेसाठी आलेल्या दोन कविता.*

### सागर-सांज

**- आशिश मोरेश्वर** (पृ.५४२), शिरसई, गोवा.

मिळताती सागराला, सांजवेळी सर्व वाटा,
जिथे स्वागत करताती, पाय स्पर्शुनिया लाटा
गादी वाळूची तलम, घाली साद सागराला
एकसुरी आवाजात, येती लाटा भेटायला.
चमचमे सूर्य लाल, दूर निळ्या आकाशात,
स्थिर असे तो गगनात, परी हले सागरात
जशी होळीच्या दिवशी, असे रंगांची खैरात,
तसे रंग भास्कराचे, पसरती गगनात
सागराला करुनिया, एकवार नमस्कार,
होई गुडुप भास्कर, मग अंधार अंधार
खळाळत्या लाटांवर, खाई गटांगळ्या मन,
डोळी दृश्य साठवून, घरी परतती जन

***

### निर्माल्य

**- सौ. रमा वासुदेव दांडेकर,** सांगली
(भास्कर दत्तात्रय, पृ.२१, वाडा यांची मुलगी)

गेला जरी बहर फुलांचा
तरी तू ये भेटीला
शब्दांनी तुझ्या फुलेल हा
बगीच्या माझ्या मनातला ।।१।।
जाताना वास येईल तुला
तेव्हाच तुला पटेल रे
कळ्या आहेत मुक्या साऱ्या
तू येऊन त्यांना फुलव रे ।।२।।
नको रे देऊस कोमेजू
फुलू दे एकदाच त्यांना,
चरणस्पर्शांनी तुझ्या
निर्माल्य होऊ दे त्यांना ।।३।।

***



Marathe Pratishthan

# विवाह सहाय्य

*हितगुजच्या वाचकांनी त्यांच्या कुटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिती 'विवाह सहाय्य' या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी.*

*बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार. त्यामुळे कपिगोत्र नसणाऱ्या मुलां-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.*

*कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. - संपादक*

**क्र. १३/२००२ वर** - रोहित प्रभाकर खरे, कोकणस्थ ब्राह्मण, गोत्र-कौशिक, जन्म - १५.११.१९७६, उंची ५'-६'', शिक्षण - बी.ई. (सिव्हील), कॉन्ट्रॅक्टर, मासिक प्राप्ती रु. १०,०००. आई वडील आहेत. एक भाऊ विवाहित, बहीण नाही, स्वत:चे घर. **अपेक्षा** - कोकणस्थ, करीयर करायची तयारी असल्यास वाव मिळेल. **संपर्क** - प्रभाकर हरीभाऊ खरे, आसावरी अपार्टमेंट, लोंढे कॉलनी, मिरज, ४१६४१०. फोन : ०२३३-२२४९९६ (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. १४/२००२ वर** - प्रसाद अरविंद परचुरे, कोकणस्थ ब्राह्मण, गोत्र-शांडिल्य, जन्म - ४.९.१९७६, उंची ५'-९'', शिक्षण - बी.ई. मेकॅनिकल, कायनेटिक इंजिनियरिंग, पुणे येथे नोकरी, मासिक प्राप्ती रु. ९,०००. पुण्यात रहाण्याची सोय. मिरजेत स्वत:चे घर. **संपर्क** - अरविंद माधव परचुरे, दत्त कॉलनी, सुभाष नगर, मिरज - ४१६४१० फोन : २२६४०१. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. १५/२००२ वर** - मोहन मोरेश्वर काळे, कोकणस्थ ब्राह्मण, गोत्र-वत्स, जन्म - नोव्हेंबर १९७१, उंची ५'-२.५'', शिक्षण - बी.कॉम्, मार्केटिंग, मासिक प्राप्ती रु. ८ ते १० हजार. आई वडील आहेत. एक बहीण विवाहित, मुंबईत स्वत:चा वन रूम किचन फ्लॅट. **संपर्क** - सुनिल काळे, ११८७/२ राजारामपुरी ५वी गल्ली, कोल्हापूर. फोन : ५२४९६६, ५२२९२३ (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. १६/२००२ वर** - महेश प्रभाकर मराठे, कोकणस्थ ब्राह्मण, गोत्र-कपि, जन्म - २७.४.१९६९, उंची ५'-६'', डिप्लोमा ऑटोमोबाईल शेवटचे वर्ष अपूर्ण, स्वत:चे चारचाकी गाड्यांचे गॅरेज, मासिक प्राप्ती रु. ६०००. आई वडील आहेत. एक बहीण विवाहित, आंबाजोगाई येथे स्वत:चे घर. **संपर्क** - प्रभाकर महादेव मराठे, नमकीन हॉटेल मागे, मु. पो. मोरेवाडी, पो. चनई, आंबाजोगाई, जि. बीड. फोन : ०२४४६-४५२३९ (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. १७/२००२ वर** - दिनेश रा. कुलकर्णी, देशस्थ ब्राह्मण, गोत्र-कौंडिण्य, जन्म - ११.९.१९६५, उंची - ५'-८'', डी.एम.इ. नोकरी, मा. प्रा. रु. १००००, आई वडील आहेत. हुबळी मध्ये घर व शेती. **अपेक्षा** - बी.कॉम., बी.एस.सी. **संपर्क** - आर. जी. कुलकर्णी, के. एम. लेले बिल्डिंग, स्टेशन रोड, मिरज - ४१६४१०. फोन : २२३५७८ (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. १८/२००२ वर** - व्यंकटेश अनंतराव कोप्पळ, देशस्थ ब्राह्मण, गोत्र-विष्णुवर्धन, जन्म - ८.९.१९७५, उंची - ५'-८'', डी. फार्मसी, मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह, मा. प्रा. रु. ७५००, आई वडील आहेत. एक भाऊ विवाहित, स्वत:चा फ्लॅट. **अपेक्षा** - ग्रॅज्युएट. **संपर्क** - अनंतराव कोप्पळ, राघवेंद्र अपार्टमेंट, विश्रामबाग स्टेशन समोर, विश्रामबाग, सांगली ४१६४१५. फोन : ३०५०२० (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. १९/२००२ वर** - गिरीश शामराव सरडे, देशस्थ ब्राह्मण, गोत्र-भारद्वाज, जन्म - १२.१२.१९७३, उंची ५'-७'' बी.ए.एम.एस., एम. डी. पंचकर्म, स्वत: व्यवसाय, मा. प्रा. रु. १५०००, आई वडील आहेत. एक भाऊ विवाहित, सांगली व पुणे येथे स्वत:चे फ्लॅट. **अपेक्षा** - सामाजिक दृष्टिकोन असलेली व पत्रिकेत मंगळ असलेली. **संपर्क** - शाम व्यंकटेश सरडे, अर्चना अपार्टमेंट, कॉसमॉस बँक गल्ली, मयुर कॉलनी, कोथरुड, पुणे - ३८. फोन : ५४२११७८. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. २०/२००२ वर** - सत्यजीत किशोर कुलकर्णी, देशस्थ ब्राह्मण, गोत्र-अत्रि, जन्म - २२.५.१९७६, उंची - ५'-७'', शिक्षण - बी.कॉम. रयत बँक सातारा येथे नोकरी, मा. प्रा. रु. ६५००, आई वडील आहेत. कोल्हापूर मधे राजारामपुरी येथे २००० चौ. फुटाची बंगली. **अपेक्षा** - गोरी, ५'-२'' ते ५'-४'', नोकरीची गरज नाही. इतर कलांची आवड असावी. **संपर्क** - के. डी. कुलकर्णी, १६ यादोगोपाळ पेठ, सुयश अपार्टमेंट, समर्थ मंदिर रस्ता, सातारा. फोन : ०२१६२-८०६८९. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. २१/२००२ वर** - सुधीर लक्ष्मण भोकरे, देशस्थ ब्राह्मण, गोत्र-काश्यप, जन्म - ३.११.१९७३, उंची - ५'-८'', बी.एस.सी., कॉम्प्युटर डिप्लोमा, पिढीजात सराफी व्यवसाय, मा. प्रा. रु. १५००० पेक्षा जास्त, **अपेक्षा** - गोरी, ५'-२'त्या पुढे, नोकरीची अपेक्षा नाही. **संपर्क** - लक्ष्मण बळवंत भोकरे, क्षितीज, भोकरे गल्ली, ब्राह्मणपुरी, मिरज, जि. सांगली ४१६४१०. फोन : २२२७९३, २२२७६३. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. २२/२००२ वर** - अतुल गोविंदराव कुलकर्णी, देशस्थ ब्राह्मण, गोत्र-भारद्वाज, जन्म - २७.१०.१९७२, उंची - ५'-७'', बी.एस.सी., अंबरनाथ येथे कंपनीत सुपरवायझरची कायम नोकरी, मासिक प्राप्ती रु. ६०००, डोंबिवली येथे टू रूम लीव्ह लायसेन्सवर आहेत, मिरज येथे स्वत:चा फ्लॅट. **अपेक्षा** - ग्रॅज्युएट, नोकरी करणारी. **संपर्क** - गोविंदराव वासुदेव कुलकर्णी, श्रीराम अपार्टमेंट, रुम नं. १५, ब्राह्मणपुरी, मिरज ४१६४१०.

Marathe Pratishthan

(म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. २३/२००२** **वर** - पंकज मुकुंद मैंदर्गी, देशस्थ ब्राह्मण, गोत्र-श्रीवत्स, जन्म - ७.३.१९७५, उंची - ५'-५'', शिक्षण : बी.कॉम. एल.एल.बी., मासिक प्राप्ती रु. ७०००, आई वडील आहेत, वडील निवृत्त प्रिन्सिपॉल, स्वत:चे घर, दोन बहिणी विवाहित, एक बहीण अविवाहित. **अपेक्षा** - सुदृढ, सुशिक्षित. **संपर्क** - मु. रा. मैंदर्गी, मेघमल्हार, अंबाबाई देवळाजवळ, मिरज. फोन : २२५२७५. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. २४/२००२** **वर** - वसंत सुरेश मराठे, को.ब्रा., गोत्र-कपि, जन्म - २७.१०.१९७२, उंची - ५'-८'', गोरा, सुदृढ, चष्मा नाही, बी.ई. इलेक्ट्रॉनिक्स (सॉफ्टवेअर इंजिनिअर), सध्या अमेरिकेत काही वर्षे राहणार, वडील पेन्शनर, आई औषध कंपनीतून स्वेच्छा निवृत्त, मोठी बहीण विवाहित, धाकटा भाऊ नानावटी हॉस्पिटलमधे कायम नोकरी, बृहन्मुंबईत दोन स्वतंत्र जागा, **अपेक्षा** - को.ब्रा., इंजिनिअर अथवा तत्सम उच्च पदवीधर, चष्मा नसावा, उंची - ५'-३'' चे पुढे. **संपर्क** - सुरेश भिकाजी मराठे, बी १/८ ओम गीतांजली, वैशालीनगर, पावसकर मार्ग, दहिसर (पूर्व), मुंबई ४०००६८. फोन : ८९६४२७६. **(ऑगस्ट २००२ मधे मुंबईला येत आहे.)**

**क्र. २५/२००२** **वर** - उन्मेष विद्याधर खांबेटे, कोकणस्थ ब्राह्मण, गोत्र-कपि, जन्म - १८.१२.१९७५, B.Tech (Mch. Eng.), MBA, इंदूरला एशियन पेंटस् मधे एरिया मॅनेजर, वेतन रु. ४२०००, एकुलता एक, आई कॅनरा बँकेतून स्वेच्छा निवृत्त, वडील मुंबईत इंडियन ऑइल कंपनीत डेप्युटी मॅनेजर, **अपेक्षा** - अनुरूप. **संपर्क** - श्री. विद्याधर अनंत खांबेटे, ए-६०३ इंडियन ऑइल नगर, जे. पी. रोड, अंधेरी (प.), मुंबई - ४०० ०५८. फोन - ६३७३५८८. (मुलाचे आजोबा अ. धों. खांबेटे यांचेकडून प्राप्त)

**क्र. २६/२००२** **वर** - समीर विश्वास जोशी, शांडिल्य, जन्म - ५.५.१९७६, उंची ५'-९'', B.E. (Mech.), M.B.A., Computer, गोरा, नोकरी व स्वत:चा व्यवसाय, मा. प्रा. रु. १२०००, **अपेक्षा** - सुंदर, गोरी, डबल ग्रॅज्युएट, पत्रिका पहाणे आहे. **संपर्क** - विश्वास श्री. जोशी, साईकृपा, पांडुरंग वाडी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३, फोन : ८७४३९१२ (मुलाची आत्या सौ. सुमन प्रभाकर, पृ.६१ यांचेकडून)

**क्र. २७/२००२** **वधू** - कु. रसिका कमलाकर गंधे, देशस्थ ब्राह्मण, जन्म - ९.१.१९६८, उंची - ५'-२'', बी.कॉम.एल.एल.बी., साई सर्व्हिस मधे नोकरी, **संपर्क** - पद्माकर रंगनाथ गंधे, पूनम अपार्टमेंट, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४०० ०५२, फोन : ५३८१०३६. (मुलीची मावस आजी सौ. सुमन प्रभाकर, पृ.६१ यांचेकडून)

**क्र. २८/२००२** **वर** - श्रीपाद राजाराम खाडीलकर, को.ब्रा., गोत्र-काश्यप, जन्म - ९.८.१९७२, उंची - ५'-८'', शिक्षण : B.Com., व्यवसाय धार्मिक वस्तूंचे दुकान, मासिक प्राप्ती रु. ६००० चे वर, आई-वडील आहेत, दोन बहिणी विवाहित, एक भाऊ विवाहित, स्वत:चा स्वतंत्र फ्लॅट तयार, **अपेक्षा** - बारावी ते पदवीधर, व्यवसायात मदत करणारी, देशस्थ अगर कोकणस्थ. **संपर्क** - श्री. श्रीपाद राजाराम खाडीलकर, गांव भाग, गोरे कार्यालयाशेजारी, सायली अपार्टमेंट, सांगली. फोन : ०२३३-३३३६९६ (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. २९/२००२** **वर** - अनिल गजानन फाटक, को.ब्रा., गोत्र-कौशिक, जन्म - ११.११.१९६९, उंची - ५'-१०'', B.Com., नोकरी - आर. एम. मोहिते स्पिनींग मिल, मासिक प्राप्ती रू. ३०००. आई-वडील आहेत. स्वत:चे घर कोल्हापूर येथे, एक बहीण विवाहित, भाऊ नाही, चष्मा नाही, मंगळ नाही. **संपर्क** - श्री. गजानन शंकर फाटक, ७९० वैभव, आय.टी.आयचे मागे, कोल्हापूर - ४१६००७. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३०/२००२** **वर** - राघवेंद्र विष्णु थत्ते, को.ब्रा., गोत्र-शांडिल्य, जन्म- २८.५.१९७०, उंची - ५'-४'', B.Com., व्यवसाय मेडिकल स्टोअर, मासिक प्राप्ती रु. ७०००, आई-वडील आहेत, एक बहीण विवाहित, भाऊ नाही, वडिलांचे नावावर एक, मुलाचे नावावर एक घर. सांगली येथे फ्लॅट, तसेच कुंडल येथे घर. **अपेक्षा** - ब्राह्मण पोटशाखेतील D.Farm, B.Farm. **संपर्क** - श्री. विष्णु विनायक थत्ते, श्री मेडिकल स्टोअर, मु. पो. वायफळे, ता. तासगांव, जि. सांगली फोन : ०२३३-६७१११. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३१/२००२** **वर** - प्रा. प्रसाद गोविंद रानडे, को.ब्रा., गोत्र-भारद्वाज, जन्म - १८.७.१९७५, उंची - ५'-७'', M.A. (Economics), व्यवसाय इचलकरंजी येथे प्रोफेसर, मा. प्रा. रु. ६०००, गोरापान, सशक्त, कराटे पटू, चष्मा नाही, सौम्य मंगळ, एक बहीण विवाहित, एक अविवाहित, भाऊ नाही, आई वडील आहेत, इचलकरंजी येथे चांगल्या वस्तीत १२०० चौ. फुटाचा दुमजली बंगला, आर्थिक स्थिती उत्तम, **अपेक्षा** - उंच, गोरी, पदवीधर, कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेची, **संपर्क** - श्री. गोविंद कृष्णाजी रानडे, ४/१२५ राधाकृष्ण निवास मंगलधाम, गणपती मंदिरा जवळ, इचलकरंजी, जि. कोल्हापूर ४१६११५, फोन : ०२३०-४२१८०० (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३२/२००२** **वर** - श्री. महेंद्र नरहरी जोगळेकर, कोकणस्थ ब्राह्मण, गोत्र-अत्रि, जन्म- २२.८.१९७७, उंची - ५'-५'', B.Com., D.B.M., M.P.S.C. परीक्षा दिली आहे, खाजगी नोकरी, मा. प्रा. रु. ४००० ते ५०००, गोरा वर्ण, चष्मा नाही, मंगळ नाही, आई-वडील आहेत, भाऊ दोन अविवाहित, बहीण नाही, मुलाचे स्वत:चे टू रूम किचन घर, **अपेक्षा** - पदवीधर, एकत्र कुटुंबात राहणारी, नोकरीची अट नाही, **संपर्क** - श्री. एन. एम. जोगळेकर, सिद्धीविनायक नगरी, गोदावरी बी-२, अप्पुघराजवळ, निगडी,

Marathe Pratishthan

जि. पुणे फोन : ०२०-७६४०५४६. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३३/२००२ वर** - नारायण केशव आपटे, को.ब्रा., गोत्र-कौशीक, जन्म - २.६.१९७४, उंची ५'-८'', गोरा, सुदृढ, एम.कॉम, स्वत:च्या मालकीचे स्टेशनरी दुकान, मा. प्रा. रु. ५०००, वडील निवृत्त प्राध्यापक, आई आहे, १ भाऊ विवाहित, १ बहीण विवाहित, तीन खोल्यांचा फ्लॅट, **अपेक्षा** - घरकाम येणारी, दिसण्यास चांगली, **संपर्क** - श्री. के. वा. आपटे, यजुर्वेद अपार्टमेंट, एस. टी. कॉलनी रोड, विश्रामबाग, सांगली, फोन : ३०१६९९, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३४/२००२ वर** - अभिजीत मोहन साठे, को.ब्रा., गोत्र-वशीष्ठ, उंची - ५'-१'', जन्म - १४.५.१९७६, गौरवर्ण, चष्मा आहे, D.M.E., मा. प्रा. रु. ४५००, ३ बहिणी विवाहित, भाऊ नाही, सांगली पेठ भाग येथे वडीलार्जित घर, गांव भाग येथे २ रुम किचनचा फ्लॅट, ताबा डिसेंबर २००२ मध्ये, **अपेक्षा** - गौरवर्ण, पदवीधर, गृहकृत्यदक्ष, **संपर्क** - श्री. मोहन नारायण साठे, घर नं. २ पेठ भाग, श्री गणपती देवालयाजवळ, सांगली, फोन : ३७२९०२ (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३५/२००२ वर** - संदीप भास्कर काळे, को.ब्रा., गोत्र-वत्स, जन्म - २१.४.१९७५, उंची - ५'-१०'', चष्मा नाही, मंगळ नाही, बी.कॉम., कॉम्प्युटर डिप्लोमा, नोकरी उगार शुगर वर्क्समध्ये, पगार रु. ८०००, आई आहे, वडील आहेत, १ बहीण विवाहित, भाऊ नाही, स्वत:चा बंगला, फ्लॅट, घराचे भाडे, सुस्थिती, स्वत:चे स्टेशनरी चे दुकान, **अपेक्षा** - ग्रॅज्युएट, उंच, सडपातळ, नोकरी असल्यास प्राधान्य, **संपर्क** - श्री. भास्कर गणेश काळे, पारीजात बंगला, गुलमोहर कॉलनी, मालू हायस्कुल समोर, द. शिवाजी नगर, सांगली ४१६४१६, फोन : ३२२४१०, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३६/२००२ वधू** - कु. राजलक्ष्मी धनंजय देवल, को.ब्रा., गोत्र-कौशिक, जन्म - १८.४.१९८०, उंची - ५'-१'', B.E. (Electronics), वर्ण निमगोरा, चष्मा नाही, मंगळ नाही, आई वडील आहेत, शेती व डिपार्टमेंटल स्टोअर, **अपेक्षा** - शक्यतो इंजिनिअर, निर्व्यसनी, सुसंस्कृत घराणे, **संपर्क** - श्री. धनंजय देवल, देवल सुपर बझार, डी.एस.पी. ऑफिस समोर, विश्रामबाग, सांगली ४१६ ४१५, फोन : ३००१०९, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३७/२००२ वधू** - डॉ. कु. सरिता सुधीर कानडे, दे.ब्रा., गोत्र-वशिष्ठ, जन्म - २२.५.१९७८, उंची ५'-७'', वर्ण गोरा, लेन्स वापरते, मंगळ नाही, B.H.M.S., खाजगी हॉस्पिटलमध्ये मेडिकल ऑफिसर, मा. प्रा. रु. ५०००, आई वडील आहेत, एक भाऊ अविवाहित, पुण्यात पटवर्धन बागेत फ्लॅट, **अपेक्षा** - इंजिनियर, डॉक्टर, मनमिळाऊ, उंची -५'-१०'' ते ६'-०'', **संपर्क** - श्री. शरद गोपाळ कानडे, फ्लॅट नं. १, कीर्ती कॉम्प्लेक्स, गणेश मंदिराजवळ, विश्रामबाग, सांगली ४१६४१५, फोन : ०२३३-३०३१००, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३८/२००२ वधू** - कु. शिल्पा नरसिंह कुलकर्णी, दे.ब्रा., गोत्र-भारद्वाज, जन्म - १२.२.१९७९, उंची ५'-४'', D.T.M. (Textile Engg.) मा. प्रा. - रु. ३०००, आई वडील आहेत, भाऊ एक अविवाहित, दोन बहिणी अविवाहित, सांगली मध्ये चार खोल्यांचा फ्लॅट, **अपेक्षा** - इंजिनियर, बँक ऑफिसर, **संपर्क** - श्री. नरसिंह बळवंत कुलकर्णी, प्रणव अपार्टमेंट, मंगलमूर्ती कॉलनी, द. शिवाजी नगर, सांगली, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३९/२००२ वधू** - कु. शलाका शरद हरिदास, दे.ब्रा., गोत्र-काश्यप, जन्म - १७.३.१९७९, उंची ५'-३'', गौर वर्ण, चष्मा नाही, मंगळ नाही, B.E. (Civil), खाजगी नोकरी, मा. प्रा. - रु. ३०००, आई वडील आहेत, स्वत:चा कराड येथे बंगला, भाऊ एक अविवाहित, बहीण एक अविवाहित, **अपेक्षा** - इंजिनियर, चांगली नोकरी, **संपर्क** - श्री. शरद गोविंद हरिदास, क्षितीज, १७२ गजानन हौ. सोसायटी (पूर्व), स्टेशन रोड, कराड, जि. सातारा, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ४०/२००२ वर** - राजेश नारायण कट्टी, दे.ब्रा., वैष्णव, गोत्र-वशिष्ट, जन्म - १४.५.१९७५, उंची - ५'-६ १/२'', गोरा, चष्मा नाही, मंगळ नाही, Bsc. M.C.A., Senior Web Devloper, मा. प्रा. रु. १८०००, आई वडील आहेत, वडील SBI मधून चीफ मॅनेजर पदावरून निवृत्त, सांगली येथे बंगला, पुण्यात फ्लॅटचा ताबा नोव्हेंबर २००२ मध्ये मिळणार, **अपेक्षा** - गोरी, उंची - ५'-२'' ते ५'-४'', चष्मा नको, ग्रॅज्युएट, **संपर्क** - श्री. एन. आर. कट्टी, ४ मनीषा, स्टेट बँक कॉलनी, गुडस शेड जवळ, सांगली ४१६ ४१६, फोन : ३२५३७३, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ४१/२००२ वर** - प्रा. बलवंत जेऊरकर, दे.ब्रा., जन्म - २८.२.१९७५, उंची - ५'-४'', M.A., Mphil.set, सध्या phd चालू आहे, विलींग्डन महाविद्यालयात हिंदीचा पूर्ण वेळ प्राध्यापक, मा. प्रा. रु. १२०००, आई वडील आहेत, १ भाऊ व १ बहीण विवाहित, **अपेक्षा** - उच्च शिक्षित, रसिक, नोकरी असल्यास उत्तम, **संपर्क** - श्री. वसंतराव जेऊरकर, गोपाळ सदनिका, खरे मंगल कार्यालयाजवळ, विश्रामबाग, सांगली, ४१६ ४१६, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ४२/२००२ वर** - श्री. योगेश लक्ष्मण राजहंस, दे.ब्रा., गोत्र-गौतम, जन्म - २७.४.१९७८, उंची - ५'-९'', गहूवर्ण, बी.कॉम., मिरज एम.आय.डी.सी. मध्ये यीस्ट तयार करण्याचा स्वत:चा कारखाना, मा. प्रा. रु. ७०००, स्वत:चा बंगला, आई आहे, वडील नाहीत, १ बहीण विवाहित, भाऊ नाही, **अपेक्षा** - पदवीधर, गृहकृत्यदक्ष, **संपर्क** - श्री. योगेश राजहंस, योगेश बंगला, सह्याद्रीनगर, विश्रामबाग, सांगली, फोन : ३२१४१५, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.) ***

Marathe Pratishthan

# हवेचे पूर्वानुमान कसे तयार होते?

**प्रेषक : वामन आत्माराम** (पृ.३६६), पुणे

दूरदर्शन बातम्यानंतर हवामाचा अंदाज दिला जातो. त्यासाठी वेधशाळेत जाऊन प्रत्यक्ष काम कसे चालते ते पाहू.

भारतामध्ये हवामानाचा अंदाज देणाऱ्या मुख्य अशा पाच वेधशाळा आहेत. त्या ठिकाणी त्या प्रदेशातील हवामानाच्या नोंदी एकत्र केल्या जातात. दिल्ली, कलकत्ता, मुंबई, नागपूर व मद्रास ह्या ठिकाणी त्या प्रदेशापुरता हवामानाचा अंदाज दिला जातो.

या वेधशाळेतून ठराविक वेळी हवामानाची निरीक्षणे केली जातात. नंतर ती निरीक्षणे सांकेतिक भाषेत, टेलिफोन, टेलेक्सद्वारे मुख्य हवामान केंद्राकडे येतात. दिवसाच्या चोवीस तासात सर्व माहिती प्रथम गोळा केली जाते. ह्या कामाला चार्टिंग असे म्हणतात. प्रथम जमिनीवरील हवामानाचा नकाशा केला जातो. त्यावर समदाबदर्शक रेषा काढल्या जातात. यावरून कमी दाबाचा व जास्त दाबाचा प्रदेश कुठे आहे हे ओळखले जाते.

ह्या नकाशाच्या जोडीला इतर अनेक नकाशे तयार केले जातात. भारताच्या एका नकाशावर नुसता पर्जन्य दाखविला जातो. त्यामुळे आज पाऊस कुठे पडला याचे चित्र डोळ्यासमोर उभे राहते.

याचप्रमाणे निरनिराळ्या उंचीवरील राज्याचे नकाशे तयार केले जातात.

त्याचप्रमाणे तपमान, तपमानातील फरक, आर्द्रता, दवबिंदु वगैरे फरकांचे नकाशे तयार केले जातात.

ट्रॉपोपॉझ व जेट स्ट्रिमसाठी उभा नकाशा व ठराविक वेळी आडवा छेद घेऊन नकाशा, टी फ्रायग्राम वगैरे सर्व नकाशे तयार झाले की ते सर्व नकाशे हवामान विश्लेषण केंद्रामध्ये लावले जातात.

काल कुठे कमी दाबाचा प्रदेश होता व आज तो कुठे व किती पुढे सरकला आहे हे दोन नकाशांच्या तुलनेवरून स्पष्ट होते.

हे सर्व झाले की, हवामानशास्त्रज्ञांचे विचारविनिमय होतात. याच वेळी भूकंप, जास्त पर्जन्य, वीज, वादळ वगैरेची काही स्वतंत्र नोंद वेधशाळेकडे आली आहे का याचा समग्र विचार केला जातो. नंतर हवामानाचा अंदाज दिला जातो.

हे अंदाज करणारे शास्त्रज्ञ त्या त्या विभागात सुमारे एक तप काम करीत असतात.

भारताच्या उपग्रहामुळे आपल्या देशावरील ढगांचे चित्र आपण दूरदर्शनवर पाहू शकतो. दुसऱ्या देशाच्या उपग्रहावरूनसुध्दा भारतावरील ढगांचे चित्र आपणास मिळते. या सर्व सुविधांमुळे आपल्या देशात हवामानाचा अंदाज सुमारे ८० ते ९० टक्के बरोबर यावयास लागला आहे.

**- मधुकर शंकर अभ्यंकर**, पुणे.

बुक पोस्ट

प्रति

मराठे प्रतिष्ठान
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)

Marathe Pratishthan